नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ुगवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
कुंभळ ग्रंथ संपदा

संपादक
वा. ना. देशपांडे

टोबर १९४८] [किंमत ८ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

आक्टोबर १९४८

अनुक्रमणिका

१ अज्ञात गायकास (कविता)—'विरागी', एम्. ए. २८५

२ जाऊंच ! (कविता)—कविभूषण प्रा. ब. ग. खापर्डे २८६

३ दर्पणा ! (कविता)—बी. रघुनाथ २८७

४ वात्सल्य (कविता)—ना. मा. सरपटवार २८८

५ शंकर बाळाजी शास्त्री (परिचय)—'अंतेवासी' २८९

६ संमिश्र नाट्यप्रयोगांतील माझे कांही अनुभव—द. रा. गोमकाळे, एम्.ए.,एल्.एल्.बी. २९७

७ जातींचे छंद—ना. ग. जोशी, एम्.ए. ३०६

८ एकोणीस नि अठ्ठावीस (लघुकथा)—मधुकर श्री. मंगरूळकर, बी.ए.,एल्.एल्.बी. ३१३

९ संपादकीय ३१५

'युगवाणी'चा नोव्हेंबरचा अंक रौप्य-महोत्सव-अंक निघणार आहे. तरी ह्या महिन्यापासून वर्गणीदार होणारांना हा आकर्षक अंक मिळेल ! तावडतोब वर्गणीदार व्हा !



युगवाणी

अज्ञात गायकास—

विरागी

भव्य मंदिरीं कळस, ऋतूंमाधि वसंत, नभिं विधु जसा,
भालदेशिं वा तिलक, तसा तूं मदंतरीं राजसा! १

हृदयासनिं आरूढ होउनी गासी नव गीतिका;
तिथें घुमविसी रव, तालावर नाचविसी मज निका. २

एक सुराचे अनंत झाले, रोमरंध्रिं दाटले,
रोमांचित तनु करुनि जाहले, व्यक्त, विश्वि कोंदले. ३

मेघ-सिंधुच्या गभीर घोषीं पवनतरंगांतरीं,
भृंगगुंजनीं मधुर पिकाच्या स्वैर पंचमस्वरीं, ४

झऱ्याचिया झुळझुळींत झिल्लीरवींहि कर्कश अति
तीव्र विजेच्या कशाघातिं ते प्रतिरवता पावती ! ५

अनंत रविं या एकत्वाचें गाणें स्फुरतें परी,
केंद्ररूप त्या एकत्वामधि सुरे स्फुरुनि बहुपरी. ६

तें विश्वाचें केंद्र लपसि तूं खोल हृदयगव्हरीं,
स्वरसरिता बहु एकमुखानें मिळती स्वरसागरीं. ७

अससी ऐसा अद्भुत गायक गासि रागरागिणी,
वससी परि तूं अदृश्य ! ताना घेसि हृदयहारिणी ! ८

विस्मय दाटे घडिघडि चित्तीं ऐकुनि तव गान तें !
ऐकावें तें संतत नुरवुनि बाह्यस्मृति, वाटतें ! ९

कंटक जीवनपथिं जे भरले, उतारचढ लागती,
गानसुमांची शेज त्यांवरी पसरुनि दाविसि गति. १०

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जाऊंच ?

कविभूषण बळवंत गणेश खापर्डे

चला चला, जाऊंच गड्या !–
दारांच्या उघडून कड्या;
कड्यांवरुनिया मारुं उड्या
पर्वतरानीं ह्या उघड्या.
रम्य सरोवर,
रान मनोहर,
उंचहि डोंगर;
सुंदर वाहत वायु तसा,
जाउनिया सेवूंच कसा ! १

स्वच्छ सरोवरसलिलांत
सृष्टि पाहुणी ही येत !
डोंगर, रानें, आकाश
सर्वांचा येथे वास !
रंग किती तरि
नभीं, जलावरि;
सृष्टि बावरी–
हर्षानें झाली वाटे;
चला चला, जाऊंच तिथे २

विशाल–वृक्षच्छायेंत
वसुनी ऐकूं तें गीत.
लपुनी त्याच्या पानांत
कोणी पक्षी जें गात.
गानमाधुरी
चित्त हें भरी;
जीवही वरी
आनंदाच्या राज्यांत
अज्ञाताच्या देशांत ! ३

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दर्पणा !

बी. रघुनाथ

दर्पणा !—
तिच्या तुज ठाउक खाणाखुणा !
सुरचित सुंदर कबरीबंधन
मुक्त होय मन्मनास बांधुन
तुझी कला की तिचा सहजगुण !
कुरल कुटिल त्या उकल गुंतिचा
तुला कशाला रे चवणा ! १

स्नात मनोज्ञा दिसावया ती—
उभ्या आड संस्कृतिच्या भिंती
कड्या कवाडे नेत्र रोधिती
तुला मात्र बाजार खुला तो
कळे का न तिज दिसते ना ! २

गाठ जिथे पडते हृदयांची
गाठ तुझ्या ती तर ओळखिची
पदर आडवा अग्हांस जाची
असभ्य साऱ्या तुझिया लीला
सभ्य मानिते कुलांगना ३

* * *

भक्त रसिक मी तिचा प्रेमधन
विविध तिचें मजसाठि प्रसाधन,
मी मानव, नच मनोज्ञ तुजसम,
तूं मात्र हुबेहुब अंग रंग ते
पाहुनि होशी तन्मय ना ! ४

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वात्सल्य

ना. मा. सरपटवार

होती कामांत गुंतली
मायमाऊली बाळाची
पाळण्यांत चुळबूळ
भुकेमुळे तान्हुल्याची! १

चार दाणे तांदळाचे
होते अंगणीं पडून
आला चिमण्यांचा थवा
दाणे टिपाया उडून! २

होती चिमणीची चोच
तिच्या पिलाच्या चोंचींत
माऊलीची गेली दृष्टी
दृश्याकडे अवचित! ३

वत्सलता जागी झाली
पान्हा हृदयीं फुटला
नकळत माउलीने
बाळ हृदयीं घेतला. ४

काम टाकून माऊली
कशी आली बाळाकडे!
नाही सुटलें कोणाला
घरांत हें गोड कोडें! ५

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शंकर बाळाजी शास्त्री

'अंतेवासी'

● नागपूरचे अष्टपैलु साहित्यिक रा. शंकरराव शास्त्री यांचा परिचय 'अंतेवासी' यांनी अतिशय जिव्हाळ्याने लिहिलेला आहे. वाचकांस तो फार आवडेल, अशी खात्री आहे.

*

आपल्याला अत्यंत आवडणाऱ्या किंवा आत्यंतिक आदर वाटणाऱ्या निकटवर्ती व्यक्तीचा परिचय करून द्यावयाचा झाल्यास मनाची कशी तारांबळ उडते, ह्याचा अनुभव मला ह्या क्षणीं येत आहे. सुप्रसिद्ध वैदर्भीय साहित्यिक रा. शंकर बाळाजी शास्त्री यांच्या संबंधींचा परिचय-लेख मी लिहावा, अशी सूचना रा. वामनराव देशपांडे यांनी करतांच मला त्यांचें मन मोडवलें नाही आणि 'हा लेख मी अवश्य लिहितों' म्हणून त्यांना कळवून सुद्धा टाकलें. आज मात्र माझी स्थिति मोठी विचित्र झाली आहे! जगांत वावरत असतांना अनेकांच्या ओळखी झाल्या; परंतु त्या ओळखींचें रूपांतर निकटवर्तीपणांत कितपत झालें, किंवा आपुलकींत किती झालें, ह्याची मोजदाद ज्या वेळीं मी करूं लागतों, त्या वेळीं निकटवर्तीपणा आणि आपुलकी ह्यांची बेरीज करण्याऐवजीं आपल्या आजपर्यंतच्या आयुष्यांत वजाबाकीचेंच प्रमाण अधिक आहे. आणि उत्तरादाखल येणाऱ्या आकड्यांची संख्या केवळ हाताच्या बोटावर मोजतां येण्याजोगीच आहे,-असें वाटूं लागतें! रा. शंकरराव शास्त्री यांच्या-संबंधीं मला वाटणारी आपुलकी आणि आदर अपार आहे, हें प्रथम सांगून टाकलें पाहिजे. वृत्तपत्र--सृष्टींत गेलीं बारा वर्षे सतत वावरत असतांहि लेखनासंबंधींचा जो पेच कधी पडला नव्हता, तो आज माझ्यासमोर 'आ' वासून उभा आहे! हें कसें साधेल, तें सांगवत नाही. मी प्रयत्न करणार आहें.

शंकरराव यांना आम्हीं सर्वच 'शंकरभाऊ' अशा नांवाने संबोधतों. शंकरभाऊंचें आतापर्यंतचें एकंदर आयुष्य आठवलें की, एखाद्या अर्धविस्मृत सुंदर श्लोकाची आपण आठवण करावी आणि त्यांतच बराचसा काळ निघून जावा, तसें वाटतें. त्यांच्या जीवनाला अनेक कप्पे आहेत. दुसऱ्या लोकांना कदाचित् ते कधीच दिसणार नाहीत. गेल्या दीड-दोन दशकांत पुढे आलेल्या वैदर्भीय साहीत्यिकांचा एक प्रमुख विशेष आहे आणि तो म्हणजे, त्यांची पराकोटीस पोचलेली प्रसिद्धि-पराङ्मुख वृत्ति! साहित्यक्षेत्रांत विदर्भ हा मागासलेला विभाग आहे, असा जो महाराष्ट्रांत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दुर्लौकिक पसरलेला आहे, तो ह्याच कारणानें असावा, अशी माझी धारणा आहे. १९३० सालानंतर अमरावतीच्या शाळांतून हायस्कूलचें शिक्षण घेऊन बाहेर पडलेली बरीच तरुण मंडळी पुढे उत्तम साहित्यिक झाली. विदर्भ हा मुळांतच सधन विभाग आहे. त्या दृष्टीने, इतर विभागांत राहणाऱ्या लोकांच्या अंगीं दिसणारी धडपड, वैदर्भीय व्यक्तींत अपवाद म्हणूनच दिसत असावी. तल्लख बुद्धिमत्ता आणि थोर साहित्यिकांचे सर्व गुण अंगीं असूनहि कित्येक वैदर्भीय साहित्यिक ऐदी झाल्याचीं अनेक उदाहरणें देतां येतील. ह्या विधानाला अपवाद असलेल्या रा. पु. य. देशपांडे, अनिल, वा. ना. देशपांडे, गु. ह. देशपांडे, सोमण, काळी, मांजरेकर, या. मु. पाठक, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. म. श्री. पंडित, कै. वासुदेवराव फडणीस, कै. मावकर, कै. अण्णाजी बोबडे, कै. जयकृष्णपंत उपाध्ये, विश्राम बेडेकर, वकील प्रभृति साहित्यिकांनी गेल्या दीड दशकांत विदर्भांत साहित्यिक जागृति निर्माण करण्याचें कार्य केलें; आणि ह्याच साहित्यिकांच्या मालिकेंत रा. शंकरराव शास्त्री यांनाहि बहुमानाचें स्थान द्यावें लागेल. प्रसिद्धिपराङ्‌मुख वृत्ति ह्या सर्वच वऱ्हाडी लोकांच्या अंगीं पुरेपूर बाणलेली आहे, हें पुनःपुन्हा सांगावेंसें वाटतें. तसें जर नसतें, तर ही मंडळी केव्हाच 'प्रथितयश साहित्यिक' म्हणून चमकली असती, असा माझा विश्वास आहे. ह्या सर्वच साहित्यिकांची ओळख महाराष्ट्राला फार उशीरा झाली, हें प्रामुख्याने सांगून टाकलें पाहिजे. ह्या मंडळीने नव्या धर्तीची आधुनिक प्रणालि विदर्भांत निर्माण केली आणि त्यानंतर आज दिसत असलेले बरेच उदीयमान साहित्यिक हळू हळू पुढे येऊं लागले. विदर्भांत साहित्याची आवड निर्माण करण्यांत शंकरराव यांचा बराच मोठा हिस्सा आहे आणि तें श्रेय जर त्यांना दिलें नाही, तर फार मोठा कृतघ्नपणा केल्यासारखें होईल!

आधुनिक बंगाली वाङ्मय अत्यंत समृद्ध आहे. ह्या वाङ्मयाचें लोण महाराष्ट्रांत आणून पोंचविण्याचें श्रेय रा. वि. सी. गुर्जरप्रभृतींबरोबर शंकररावांच्याहि वाट्यास येते, ही गोष्ट आज महाराष्ट्र विसरला आहे, ही खेदाची गोष्ट आहे. शंकररावांना समकालीन असणाऱ्या गुर्जरप्रभृति साहित्यिकांनी सुरुवातीला बंगालीचीं मराठी भाषांतरें केलीं, हें खरें असलें, तरी बंगाली साहित्याचा भरीवपणा महाराष्ट्रांत आणून ओतण्याचें महान् कार्य शंकररावांनीच केलें. बंगाली वाङ्मय त्यावेळी फारसें वाचलें जात नसे. त्या वाङ्मयांत अलोट संपत्ति सामावलेली आहे, ह्याचीहि त्यावेळीं फारशी जाणीव नव्हती. शंकररावांनी 'प्रपंच-कथा' ह्या नावाखाली कांही बंगाली गोष्टींचे प्रथम अनुवाद केले आणि ते दोन खंडांत भारत-गौरव-ग्रंथमालेकडून प्रसिद्ध झाले. तेव्हांच बंगाली वाङ्मयाची चुणूक प्रथमतः महाराष्ट्रीयांच्या प्रत्ययास आली. गुर्जर आणि भसे यांनी कांही बंगाली कादंबऱ्यांचीं भाषांतरें केलीं. पण त्या भाषांतरांचें स्वरूप शब्दशः केलेल्या भाषांतरासारखें होतें. शंकररावांनी तो पायंडा पाडला नाही. त्यांनी बंगाली कादंबऱ्यांचें 'रूपांतर' केलें. बंगाली कादंबरींतील मूळ कल्पनेला हाताशी धरून तिला महाराष्ट्रीय पेहेराव त्यांनी चढविला. त्यांची 'अनलज्वाला' किंवा 'नवीं क्षितिजें' ही पुस्तकें खूपच गाजलीं. कै. शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांचा शंकरराव यांच्याशीं मध्यंतरी निकटचा संबंध आला आणि हळू हळू त्यांच्यावर शरद्‌बाबूंच्या साहित्याचा पगडा बसत गेला. त्यांच्या 'प्रपंच-कथा' संग्रहांतील बरेच कथा मुळांतल्या शरद्‌बाबूंच्या होत्या. त्यानंतर त्यांनी अनुवादासाठी निवडलेली

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'सौदामिनी' ही कादंबरीसुद्धा शरद्बाबूंचीच होती. 'अनलज्वाला' आणि 'नवीं क्षितिजें' ह्या कादंबऱ्या अनुवादित आहेत, असें ज्यांना म्हणावयाचें असेल, त्यांनी तसें खुशाल म्हणावें. मी मात्र तसें विधान करणार नाही. ह्या दोन्ही कादंबऱ्यांचा मूळ सांगाडा सोडून दिल्यास, सर्व साजशृंगार शंकररावांचा आहे आणि त्याबद्दल स्वतः शरद्बाबूंनी त्यांची पाठ थोपटली होती, हें फारच थोड्या लोकांना ठाऊक असेल.

अनुवाद ही एक महान् कला आहे. ती सर्वांनाच साधते, असें नाही. ह्या कलेला पाश्चिमात्य साहित्यांत मानाचें स्थान प्राप्त झालें आहे. अमुक एका भाषेत एखादें पुस्तक प्रकाशित होतांच पाश्चिमात्य देशांतील प्रत्येक भाषेत त्याची भाषांतरें होत असतात, हें आपण पाहतों. अनुवाद हा साहित्य क्षेत्रांतील देवाण-घेवाणाचा एक प्रकार आहे. त्यामुळे साहित्य समृद्ध होत असतें. परंतु सर्वच बाबतींत दुर्दैवी असलेल्या महाराष्ट्राला अनुवादित साहित्याचें महत्त्व अद्यापहि कळलेलें नाही! अनुवादित साहित्याकडे दुय्यम दृष्टिने पाहण्याची त्यांची खोड अद्यापहि कायम आहे. महाराष्ट्रीयांची सकुंचित वृत्तीहि त्याला बरीचशी कारणीभूत आहे, असें म्हटल्यास मुळीच वावगें होणार नाही; तसें पाहिलें, तर अभिजात साहित्य निर्माण करण्याची पात्रता असलेले फारच थोडे लोक महाराष्ट्रांत आहेत, असें म्हटल्यास फारशी हरकत होणार नाही. साहित्याच्या एकंदर प्रवाहाकडे आणि प्रगतीकडे बारकाईने पाहिल्यास भरीव स्वरूपाचें साहित्य मराठींत फारसें निर्माण होऊं शकलें नाही, हेंहि प्रत्ययास येऊन चुकलें आहे. मुंबई-पुण्याकडील कांही साहित्यिकांना आणि विदर्भातीलहि कांही साहित्यिकांना माझें हें विधान कदाचित् रुचणार नाही. माझ्यावर त्यामुळे टीकेची झोड सुरू होईल, ह्याचीहि मला जाणीव आहे. परंतु जें दिसतें आणि जें वाटतें, तें जर मीं स्पष्ट शब्दांत मांडलें नाही, तर मी खोटेपणा करीत आहें, असें होईल. मला दांभिकपणा करावयाचा असता, तर 'जगांतील अत्यंत समृद्ध आणि विदग्ध वाङ्मय म्हणजेच आधुनिक मराठी वाङ्मय!' असें मत मीं ठोकून दिलें असतें. पण तसा दांभिकपणा मला करावयाचा नाही. मराठी वाङ्मयांत अद्यापहि फार मोठी खळगी पडलेली आहे. तें व्हावें तितकें समृद्ध नाही. ही खळगी भरून काढण्यासाठी बाहेरचें वाङ्मय शक्य तों अधिक आणलें गेल्यास त्यांत वैषम्य वाटण्यासारखें खरोखरीच कांही नाही. ह्याचा अर्थ असा मात्र नव्हे की, भरीव साहित्य निर्माण करणारे आधुनिक साहित्यिक आज महाराष्ट्रांत नाहीत! —तसे साहित्यिक आहेत; पण त्यांची संख्या फार थोडी आहे, इतकेंच. समृद्धीच्या मार्गांत पडलेली खळगी परवाङ्मयाच्या आयातीने भरून काढण्याचे सायास शंकररावांनी सुरू केले, म्हणून त्यांची महती मला अधिक वाटते. त्यांच्या नंतर तीच गोष्ट आज रा. वरेरकर-प्रभृति साहित्यिकहि करीत आहेत. परंतु जी गोष्ट आज वरेरकर करीत आहेत आणि म्हणून त्यांचा 'उदो उदो' होत आहे, तीच गोष्ट शंकररावांनी अनेक वर्षांपूर्वी करून सुद्धा त्यांचा 'उदो उदो' महाराष्ट्राने केला नाही—इतकेंच नव्हे, तर अनुवादित वाङ्मयाचा परामर्श घेण्याची वेळ येते, तेव्हा त्यांचा उल्लेखहि होत नाही, ही विषाद वाटण्यासारखी गोष्ट आहे!

शंकरराव यांच्या अनुवादित कादंबऱ्या आणि लघुकथा इतक्या उत्कृष्ट वठल्या

आहेत की, त्या वाचीत असतांना आपण अनुवादित साहित्य वाचीत आहोंत, असें

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाटत नाही. अनुवादाचें कौशल्य ह्यांतच आहे आणि म्हणूनच अनुवाद ही कला आहे, असें म्हणावयाचें ! मध्यंतरींच्या काळांत शंकररावांचा संबंध कै. मुन्शी प्रेमचंद यांच्याशी आला. बंगाली इतकेंच हिंदी आणि उर्दू भाषांवरहि शंकररावांचें प्रभुत्व आहे. त्यांनी त्या भाषांतून बरेंच लिखाणहि केलेलें आहे. कै. प्रेमचंद यांच्या आग्रहावरून त्यांनी त्यांची 'कायाकल्प' नांवाची कादंबरी 'चिरजीवन' ह्या शीर्षकाखाली अनुवादित केली आणि दोन भागांत ती भारत-गौरव-ग्रंथ-मालेने प्रकाशित केली. त्यांची 'नवीं क्षितिजें' ही कादंबरी खूपच गाजली. वाचकाला विचार करावयास लावण्याचें सामर्थ्य ह्या कादंबरींत आहे. अनातोल फ्रान्सच्या 'THAIS' ह्या कलाकृतीशीं मी 'नवीं क्षितिजें' ह्या कादंबरीची वैचारिक दृष्ट्या तुलना करीन. अशा तऱ्हेच्या कादंबऱ्या मराठींतून लिहिण्याचा मान केवळ कै. वामन मल्हार जोशी यांनीच मिळविला. त्यानंतर अशा प्रकारचें कादंबरी-वाङ्मय मराठींत कोणीहि लिहूं शकला नाही.

शंकररावांची पहिली कलाकृति म्हणजे 'चंद्राची कोर !' ती एक छोटीशी पुस्तिका होती. त्या पुस्तिकेने अनेकांना वेड लावल्याचें मला आजहि आठवतें. 'मृत्युंजय' नामक रशियन कथांचा संग्रह प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांची 'अमावास्या' नांवाची स्वतंत्र कादंबरी प्रसिद्ध झाली. तिची सर्वत्र वाहवा होऊं लागली. १९४२ च्या आंदोलनाचें वास्तव चित्र त्या कादंबरींत चित्रित झालें होतें. अर्थातच ९३ कलमी राजवटीला ती कादंबरी मानवली नाही आणि लगेच ती जप्तहि करण्यांत आली ! १५ ऑगस्ट १९४७ नंतर स्वतंत्र हिंदुस्थानांत त्या कादंबरीवरील बंदी उठली आणि तिची दुसरी आवृत्ति आता होऊं घातली आहे. मराठी वाचकांना चटका लावणारी त्यांची त्यानंतरची ताजी स्वतंत्र कादंबरी म्हणजे 'अडेल तट्टू' ही होय. ह्या कादंबरीचा विषय निवडण्यांत शंकररावांनी कमालीची नवीनता दाखविली. ही कादंबरी जर इंग्रजींत प्रसिद्ध झाली असती, तर पाश्चिमात्य देशांत सर्वत्र त्या कादंबरीचें असीम कोडकौतुक झालें असतें, असें मत अनेक साहित्यिक तज्ज्ञांनी प्रगट केल्याचें मला ठाऊक आहे. यशपाल जैन यांच्या 'दादा कॉम्रेड'चें त्यांनी केलेलें भाषांतर प्रकाशनाच्या वाटेवार आहे. 'चार जून' आणि 'विदुला' अशा आणखी दोन स्वतंत्र कादंबऱ्या सध्या ते लिहीत आहेत. पैकी, 'चार जून' ही कादंबरी महाराष्ट्रांत खळबळ उडवून देणारी ठरेल, असा मला विश्वास वाटतो. त्यांच्या 'अमावास्या' आणि 'अडेल तट्टू' ह्या कादंबऱ्यांचीं भाषांतरें हिंदी, बंगाली आणि गुजराथी भाषांतून प्रसिद्ध होणार असल्याचेंहि समजतें. 'अडेल तट्टू' ही कादंबरी रा. के. नारायण काळे हे रजतपटावर आणणार असून त्याचें बरेंचसें चित्रण झालेलें आहे. त्यांची 'कंगाल' ही कादंबरीसुद्धा त्यांनी मराठी साहित्याला दिलेली एक भरीव देणगीच होय !

कादंबरी वाङ्मयाप्रमाणेच लघुकथेच्या क्षेत्रांतहि शंकरराव यांनी थोडीच पण महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. मध्यंतरींच्या काळांत महाराष्ट्रांत सर्वदूर गाजलेल्या 'वागीश्वरी' मासिकाचे ते संपादक होते. 'वागीश्वरी' मासिकांत त्यावेळीं यांनी लिहिलेल्या लघुकथा अभिजात स्वरूपाच्या होत्या. त्यानंतर रा. हरिभाऊ मोटे यांनी 'प्रतिभा' पाक्षिक चालविण्यास घेतल्यानंतर त्यांनी अशा स्वरूपाचें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बरेंच लिखाण केलें; परंतु त्यापैकी बरेंचसे 'अनामिक' सदरांत गेल्याकारणानें बव्हंशीं वाचकांना तें शंकररावांनी लिहिलें होतें, हें समजूं शकलें नाहीं. महाराष्ट्रांतील इतर अनेक मासिकांतहि त्यांच्या लघुकथा वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या आहेत. 'वागीश्वरी'तील त्यांची 'राम-रहिम' ही लघुकथा माझ्या स्मरणांत अद्यापहि ताजी आहे. शंकरराव हे 'द्रष्टे' आहेत, ह्या गोष्टीची जाणीव प्रस्तुत लघुकथेमुळे आज मला होत आहे. इतकीच प्रभावी अशी त्यांची दुसरी लघुकथा म्हणजे 'जोहार' ही होय. ह्याशिवाय, 'प्रतिभा' पाक्षिकांतून आलेल्या त्यांच्या कथा तंत्रदृष्ट्या अभ्यासण्यासारख्या आहेत. बालवाङ्मय निर्माण करण्यांतहि त्यांचा हातखंडा आहे. मानवी मनाचें विश्लेषण ते जितक्या उत्कृष्ट रीतीनें करूं शकतात, तितकेंच बालकांच्या मनाचाहि ते हमखास ठाव घेऊं शकतात. 'चांदण्यासारखे डोळे' ही कथा त्या दृष्टीनें मराठी साहित्यांत अत्युत्कृष्ट ठरण्यासारखी आहे. 'राम-रहीम' वगैरे कथांचे अनुवाद हिंदी, उर्दू आणि बंगाली भाषांतून त्याच वेळीं झालेले आहेत. त्यांचें कथासाहित्य जर पुस्तकरूपानें प्रकाशित झालें, तर मराठी वाङ्मयांत त्यामुळे एक मोलाची भर पडेल......इतकेंच नव्हे, तर कथा-साहित्याची एक नवी प्रणालि निर्माण होऊं शकेल, असें मत अनेकांनी व्यक्त केलें आहे. ह्याहि बाबतींत शंकरराव यांची प्रसिद्धि-पराङ्मुख वृत्ति आड आली. प्रसिद्धीचा हपाप नसल्यामुळे इतरांसारखी पुस्तकप्रकाशनाची धडपड त्यांनी केली नाहीं. पण त्यामुळे मराठी वाङ्मयाचें फार मोठें नुकसान मात्र झालेलें आहे!

विदर्भांतील नाणावलेलें लेखक रा. विश्राम बेडेकर आणि पट्टीचे रसिक रा. हरिभाऊ मोटे यांचे व शंकरराव यांचे निकटवर्ती संबंध अनेकांना ठाऊक आहेत. मोटे यांनी 'विभावरी शिरूरकर' यांचीं पुस्तकें प्रसिद्ध करण्यास सुरवात केल्यानंतर मराठी साहित्यक्षेत्रांत निर्माण झालेली खळबळ सर्वपरिचित आहे. ही लेखिका कोण आहे, ह्याचा सुगावा लावण्याचा त्यावेळीं आटोकाट प्रयत्न झाला. कित्येक 'महान्' साहित्यिक इरेस पडून तो शोध लावण्याच्या भरीस पडले. परंतु विभावरीबाईंचा अद्यापहि खरा शोध लागला आहे, असें वाटत नाहीं! 'कळ्यांचे निःश्वास' हा लघुकथासंग्रह 'विभावरी शिरूरकर' ह्या नांवानें प्रसिद्ध होतांच जी शोधाशोध सुरू झाली, तींत विश्राम बेडेकर यांचें नांव प्रामुख्यानें ऐकूं येऊं लागलें. त्यांच्याच सोबत शंकरराव यांचेंहि नांव घेतलें जाई. विभावरीचें गौप्य शंकररावांना ठाऊक असावें, अशी माझी खात्री आहे! पण त्यासंबंधीं उघडपणें विचारण्याचा मी अद्याप धीर केला नाहीं.

कवि ह्या नात्यानें शंकरराव यांच्या अंगचे गुण अनेकदा प्रत्ययास आले आहेत. परंतु ते उत्कृष्ट कवि आहेत, ह्याची जाणीव फारच थोड्यांना असेल! त्यांच्या अंगच्या काव्यगुणांची जाणीव सुरवातीला मलाहि नव्हती. एकदा असेंच कांहीं तरी हुडकत असतांना एक रोजनिशी माझ्या हातीं पडली. ह्या रोजनिशींत कांहीं कविता लिहिलेल्या होत्या. मी चौकशी केली, तेव्हा त्या कविता त्यांनी अमरावती येथील हायस्कुलांत असतांना लिहिल्या होत्या व त्यांपैकीं बऱ्याचशा, त्यावेळीं, त्या शाळेंतील विद्यार्थ्यांतर्फे निघणाऱ्या हस्तलिखित मासिकांत आलेल्या होत्या, असें समजलें. शंकररावांचें लेखन काव्यानेंच सुरू झालें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आणि, खरोखरीच शंकररावांचें आजपर्यंतचें जीवन म्हणजे विपण्णतेचा विलास असलेलें एक करुणरम्य काव्य आहे! त्यांच्या काव्यांतून ह्या जीवनाचे पडसाद उमटले आहेत. 'नयनांत तुझ्या का नीर भरे—नीलाकाशीं घन का उमडे!' ह्या ओळींनी सुरवात झालेली

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कविता ज्या कोणी ऐकली असेल, त्याला त्याच्या भावुकतेची आणि भावनांतील आर्ततेची सहज कल्पना होईल. अशी काव्यरचना त्यांनी थोडीशीच केली. ते काव्य रचूं शकतात, ही गोष्टहि थोड्याच लोकांना ठाऊक आहे. शंकरराव स्वतः गात नसले, तरी संगीतशास्त्राचे ते उत्तम जाणकार आहेत. कै. दीनानाथराव मंगेशकर हे हिंदुस्थानांतील नामवंत गायक होऊन गेले. दीनानाथराव आणि शंकरराव यांचे जीवश्चकंठश्च संबंध होते. शंकररावांनी हिंदी, उर्दू आणि मराठी भाषेंत अत्यंत सुंदर चीजा लिहून द्याव्या आणि त्या दीनानाथरावांनी गाव्या, असें चालूं होतें. दीनानाथरावांच्या मृत्यूपूर्वी त्यांची आणि माझी गांठ पुणे येथे ज्यावेळीं पडली, त्यावेळीं त्यांच्या तोंडून मला ही गोष्ट ऐकावयास मिळाली. शंकररावांनी गायनाच्या चीजा तयार केल्या आहेत, हें मला त्यावेळपर्यंत ठाऊकसुद्धा नव्हतें. त्या चीजा लिहून देण्याचें दीनानाथरावांनी मला कबूल केलें होतें. परंतु त्यानंतर मृत्यूने त्यांच्यावर अकालीं घाला घातला आणि ती सर्व संपत्ति ते स्वतः सोबतच घेऊन गेले ! नाटकांतील पद्यरचना हाहि शंकररावांचा विशेष होय. बॅ. सावरकर यांच्या ‘ संन्यस्त खड्ग ’ नाटकांतील पदें आज अत्यंत लोकप्रिय झालेलीं आहेत. ह्यांपैकी कित्येक पदें शंकररावांच्या लेखणींतून उतरलीं आहेत, हें मात्र महाराष्ट्रीयांना अद्याप ठाऊक नाही. प्रसिद्धि-पराङ्मुख असलेल्या शंकररावांनीहि आपली तशी जाहिरात करून घेतली नाही ! कै. खरेशास्त्री यांनी आपल्या हयातीच्या अखेरीस लिहिलेल्या ‘ देशकंटक ’ नाटकांतील पद्यरचना शंकररावांची असून तें नाटक बलवंत-संगीत-मंडळीनेच बसविलें होतें. सांगलीस बलवंत पिक्चर्स, ‘ ए भट-बेडेकर-प्रॉडक्शन्स ’ आणि पारिजात-पिक्चर्स ह्या ज्या सिनेमा कंपन्या स्थापन झाल्या, त्या कंपन्यांच्या सर्वच बोलपटांशीं संवादलेखक किंवा पद्यलेखक म्हणून शंकररावांचा संबंध आलेला होता. शंकररावांची अभिजात पद्यरचना ही गोष्ट म्हणजे त्यांच्या जीवनांतील एक न उलगडलेलें प्रकरण होय !

शंकरराव यांच्या काव्यासंबंधीं हें लिहून झाल्यानंतर त्यांनी जवळ जवळ तयार केलेल्या ‘ कृष्णायन ’ नामक काव्यग्रंथाच्या मराठी रूपांतराचा मला अभिमानाने आणि प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो. महाकवि तुलसीदास किंवा महाकवि जायसी यांच्या काव्यरचनेला हिंदी वाङ्मयांत एक विशिष्ट स्थान आहे. मध्य-प्रांताचे सध्याचे गृहमंत्री ना. पं. मिश्र यांनी तुरुंगवासांत लिहून काढलेला ‘कृष्णायन’ नामक महाकाव्याचा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला असून त्याची, सर्वत्र वाहवा होत आहे; आणि, ना. पं. मिश्र यांची तुलना आज तुलसीदास व जायसी ह्या कवींशी करण्यांत येत आहे. शंकररावांनी प्रस्तुत ‘ कृष्णायन ’ ग्रंथाचे रूपांतर जवळ जवळ पूर्ण केलें आहे. ह्या रूपांतराचा विशेष हा की, ना. पं. मिश्र यांनी ह्या महाकाव्याची रचना ज्या वृत्तांत केलेली आहे, त्याच वृत्तांत शंकररावांनी त्याचें मराठीकरण केलेलें आहे. परभाषेंतील काव्य जसेंच्या जसें रूपांतरित करणें ही किती अवघड गोष्ट आहे, ह्याची ज्यांना कल्पना असेल, त्याना शंकररावांनी केलेल्या ह्या रूपांतरासंबंधींच्या यातायातीची आणि श्रमाची सहज जाणीव होऊं शकेल. ‘ कृष्णायन ’ ह्या मूळ ग्रंथाचें शंकररावांनी केलेलें मराठी रूपांतर इतकें सरस उतरलें आहे की, तो एक निराळाच स्वतंत्र मराठी ग्रंथ तयार झाला आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. ‘मराठी कृष्णायन’ ही गोष्ट शंकररावांच्या साहित्यिक जीवनांतील महान् कामगिरी होय !

बोलपट सृष्टींतहि शंकरराव यांनी थोडीच कामगिरी केलेली असली, तरी ती सुद्धा महत्त्वाची आहे. सांगलीच्या कंपन्यांशीं असलेल्या त्यांच्या संबंधाचा उल्लेख मीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वर केलाला आहे. त्यांच्या कादंबऱ्या व कथा यांवर आधारलेले कांहीं चित्रपटांचे चित्रीकरण सध्यां चालू आहे. 'अडेल तट्टू' कादंबरीवर आधारलेला त्यांचा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर महाराष्ट्रीय बोलपटसृष्टींत त्यामुळे एक नवा मनु निर्माण होईल, असा विश्वास कांही तज्ञांनी प्रकट केल्याचें मला ठाऊक आहे. स्वतंत्र हिंदुस्थानांत शैक्षणिक बोलपट तयार करण्याची मोहीम सध्या हिंदुस्थान-सरकारने सुरू केली आहे व ह्या मोहिमेंतील 'शिवरात्री' नांवाचा तयार झालेला पहिला बोलपट शंकररावांनीच लिहिला आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. सध्याचे पहिले हिंदी गव्हर्नर जनरल ना. राजगोपालाचारी यांनी लिहिलेल्या एका लघुकथेची पट-कथा तयार करण्याचें काम स्वतः राजाजी यांनी शंकररावावरच सोपविलेलें आहे. प्रांतिक सरकारच्या समाजशिक्षण-योजनेचा प्रसार व प्रचार करण्याच्या दृष्टीने कांही लघुपट तयार होणार असून त्यांची उभारणी शंकररावांच्या कथानकांवरच होणार असल्याचें ऐकिवांत आहे.

शंकरराव हे बहुगुणी आहेत. इंग्रजी, संस्कृत, हिंदी, उर्दू, बंगाली, गुजराती वगैरे भाषांचा त्यांचा अभ्यास दांडगा आहे. नाट्यवाङ्मयाचा त्यांच्याइतका सखोल अभ्यास केलेला साहित्यिक मराठी साहित्यांत अपवाद म्हणूनच आढळेल! संस्कृत आणि मराठी यांच्या इतकेच त्यांना जवळचें वाटणारें वाङ्मयक्षेत्र म्हणजे बंगाली भाषेचें होय. बंगाली वाङ्मयाची छाप यांच्या स्वतंत्र वाङ्मयनिर्मितीवरहि पडलेली दिसते. कै. शरच्चंद्र चटर्जी यांचें लिखाण तर त्यांनी इतकें आत्मसात केलें आहे की, त्यावर ते प्रवचनें देऊं शकतात. बंगाली वाङ्मयाचा त्यांच्या इतका बारकाईने अभ्यास इतर कोणी क्वचितच केलेला आढळेल. शरद्‌बाबूंच्या वाङ्मयाची त्यांच्या स्वतंत्र वाङ्मयावर छाप पडलेली आहे, इतकेंच नव्हे, तर त्या वाङ्मयाची छाप त्यांच्या दैनंदिन जीवनावरहि पडलेली आहे—इतके ते त्या वाङ्मयांत एकजीव झालेले आहेत! भाषेवर यांचें प्रभुत्व आहे. मराठी भाषा ते वाटेल त्या वळणाची लिहूं शकतात. त्यांच्या विचारांत ते तत्त्वज्ञ आहेत, असा भास होतो आणि तें खरेंहि आहे. त्यांची भाषा ओघवती आहे. त्यांचें लिखाण वाचीत असतां हस्तिदंती फलकावर केलेल्या सुंदर नक्षीकामाची जर कोणाला आठवण झाली नाही, तरच नवल! शंकरराव हे नुसते गुणी नाहीत. ते 'रसिक-गुणी' आहेत! त्यांच्या साहित्यासंबंधीं आणखी किती तरी लिहितां येईल. तें कार्य पुढील साहित्यिकांची पिढी केल्याविना राहणार नाही—कारण, शंकररावांची मौलिकता अद्याप महाराष्ट्राला कळलेली नाही!

शंकरराव यांच्या साहित्यासंबंधीं हें जें लिहिलें तें त्या साहित्याचें ओझरतें दर्शन झालें. आता, त्यांच्या व्यक्तित्वाचेंहि जर मी ओझरतेंच का होईना, दर्शन केलें नाही, तर हा परिचय पूर्ण होणार नाही; आणि हें काम, मला वाटतें, फारच नाजूक आहे. शंकरराव यांचें जीवन स्वच्छ आणि सुंदर अशा गंगौघाप्रमाणें आहे. त्यांच्याशीं निकटवर्ती संबंध असलेले लोक ते एखाद्या साधुपुरुषासारखे आहेत, असें म्हणतात. माझ्या दृष्टीने त्यांना गंगौघाचीच उपमा शोभून दिसते. शंकररावांचें जीवन विद्यासंपादनांत आणि विद्यादानांतच व्यतीत झालें. ते आदर्श शिक्षक आहेत. उत्तम शिक्षक म्हणून त्यांची सर्वत्र बोलवा आहे. त्यांचें दैनंदिन आयुष्यहि आदर्श शिक्षकाला शोभेल, असेंच आहे.

शंकररावांचा जन्म महाकोशल मधील सागर शहरीं झाला. जन्मापुरतेच ते महाकोशलचे आहेत. बाकी त्यांचे सर्व आयुष्य वऱ्हाडांतील अमरावती शहरांत आणि नागपुरांत व्यतीत झालें. अमरावतीचें हायस्कूलमधील शिक्षण आटोपल्यानंतर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांनी उच्च शिक्षणासाठी नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजमध्ये पदार्पण केलें. तेथील साहित्यविषयक संस्थांतून ते सारखे चमकत असत. ह्याच सुमारास त्यांच्या वैदर्भीय मित्रमंडळींची पांगापांग होण्यास सुरवात झाली. कॉलेजमधील प्राध्यापकांचा त्यांच्यावर अत्यंत लोभ होता. हिस्लॉप कॉलेजचे त्या वेळचे प्रिन्सिपॉल श्री. रॉबर्टसन हे सेवानिवृत्त झाले, त्यावेळीं नागपूर सोडून विलायतेस जातांना आपली आठवण म्हणून ते उमरखय्यामच्या काव्यावर आधारलेलीं दोन सुंदर चित्रें शंकररावांना देऊन गेले होते. आपल्या शिक्षकासंबंधीं शंकररावांना अद्यापहि अपार आदर वाटतो. हायस्कुलांत असतांनाच अमरावतीचे हेडमास्तर कै. देवभानकर आणि कै. ओक यांच्यासंबंधीचा आदरयुक्त उल्लेख आजहि शंकररावांच्या तोंडून ऐकावयास मिळतो. हिस्लॉप कॉलेजच्या 'मॅगझीन' च्या संपादकत्वाचा मान त्यांना मिळालेला आहे. कॉलेजजीवन आटोपल्यानंतर त्यांनी निल सिटी हायस्कूलांत शिक्षकाची पहिली नोकरी धरली. ह्याच सुमारास त्यांची 'चंद्राची कोर' 'प्रपंच कथा' व 'सौदामिनी' हीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं होतीं. शिक्षकाचा पेशा चालू असतांनाच त्यांचें लेखनहि जोरांत चालू होते. शंकररावांना परिस्थितीने घेरले नसते तर ते आज खूपच गाजलेले असे लेखक झाले असते, असा मला विश्वास वाटतो. मध्यम वर्गातील ब्राम्हण कुटुंबांत जन्माला येणाऱ्या विद्वानाच्या प्रगतीच्या आड दारिद्र्य सतत यावें, असा हिंदु इसमाला, जणू काय, शापच आहे! शिक्षणाचा पेशा पत्करण्यापूर्वी त्यांना परदेशीं जाण्याची संधी आली होती. परंतु ती संधी दैववशात् साध्य झाली नाही, आणि त्यानंतर शिक्षक म्हणून शिक्षणाच्या क्षेत्रांत त्यांचें जें पाऊल रुतलें, तें आज पर्यंतच कायमचेंच!

शंकरराव यांची वृत्ति त्यागी पुरुषाला शोभेशी आहे. आयुष्यांत त्यांना स्वतःसाठी कांहीहि करतां आलें नाहीं ह्या एकाच गोष्टीवरून त्यांच्या त्यागाची कल्पना येईल. शास्त्री-घराणें जर आज नांवारूपास आलें असेल, तर तें शंकररावामुळेच! आपल्या माता-पित्यांवर त्यांची अपार श्रद्धा आहे. आईचें छत्र १९३७ च्या जून महिन्यांत काळानें हिरावून नेलें. त्यावेळीं शंकररावांची मनःस्थिति पाहण्यासारखी होती. मला तो क्षण आणि त्यानंतरचे दिवस आजहि आठवतात. माता–पित्यांसाठी शंकररावांनी जें केलें आणि कुटुंबासाठी ज्या खस्ता खाल्या, त्यांचें वर्णन करणें म्हणजे, मानवी त्यागाच्या मीमांसेचा तो एक स्वतंत्र ग्रंथच होईल! शंकररावांचें वैवाहिक जीवन उशीरानेच सुरू झालें. त्यांचें 'नीना' नांवाच्या त्यांच्या मुलीवर अपार प्रेम आहे! नीनासाठी ते, वाटेल ते करतील! ती गोड पोर म्हणजे शंकररावांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. रात्रींच्या वेळीं चांदणें बाहेर फाकलें असतांना अंथरुणावर पडून नीनाला गोष्टी सांगणाऱ्या शंकररावांना ज्यांनी पाहिले असेल, त्यांना अपार कुतूहल वाटलें असेल, अशी माझी खात्री आहे!

शंकरराव यांच्या साहित्याचे पैलू जितके चमकदार आहेत, तितकेच त्यांच्या जीवनांतील कप्पे, कोठडींत दडवून ठेवलेल्या तेजस्वी हिऱ्यासारखे आहेत. त्यांच्या जीवितासंबंधीं मला किती तरी लिहितां येईल. मानवी स्वभावाचा एक अत्युत्कृष्ट नमुना म्हणजेच शंकरराव! इतकें सर्व लिहून झालें, पण अद्यापहि बरेचसें लिहावयाचें राहून गेलें आहे, असें वाटतें! अर्धविस्मृत सुंदर श्लोक आठवण्याचा प्रयत्न करावा, तसें झालें आहे. मला वाटतें कदाचित् आणखी लिहिण्याचा प्रयत्न केला, तर मी हळुवार होऊन जाईन! आज मला तें नको आहे. शुद्ध, स्वच्छ आणि सुंदर अशा गंगौघाप्रमाणे दिसणाऱ्या शंकररावांच्या जीवन–सरितेच्या सलीलश्रीमान् पात्राकडे पाहूनच मी आपली तहान भागवून घेत आहे! ●●●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संमिश्र नाट्यप्रयोगांतील माझे कांही अनुभव

द. दा. गोमकाळे, एम्. ए., एल्एल्. बी.

' The Drama's Laws Dramas Patrons give

Dryden.

● नागपूरच्या अभिनव नाट्यमंदिराचे एक आधारस्तंभ व नाट्यप्रेमी साहित्यिक रा. गोमकाळे यांनी या लेखांत संमिश्र नाट्यप्रयोगाचे आपले अनुभव सांगितलेले आहेत. ते जितके मनोरंजक तितकेच उद्बोधक आहेत.

●

प्रेक्षक, संचालक आणि नट अशा तिहेरी नात्यांनी संमिश्र नाट्यप्रयोगांशी माझा संबंध आलेला आहे. आणि या तीनहि भूमिकांवरून मी संमिश्र प्रयोगांतील हर्ष-विषादकारक अनुभव घेतले आहेत. हा आलेला संबंध केवळ आगंतुक कारणाने आलेला नसून या विषयाबद्दल ज्या कुणाला पोटतिडीक असेल, अशा मंडळींत मी माझी गणना करीत असल्यामुळे मराठी रंगभूमीच्या कार्यात आपलाहि कांही भाग असावा, या हेतूने तो आलेला आहे. नट आणि संचालक या दृष्टीने माझे अनुभव स्थलविशिष्ट आहेत. प्रेक्षक म्हणून माझ्या अनुभवांना कोणत्याहि स्थलाचें बंधन असण्याचें मात्र कारण नाही.

मराठी रंगभूमीवर गेल्या ६० वर्षांत कांही नटींनी कांही भूमिका केल्या—तात्पुरती त्यांना थोडी फार प्रसिद्धीहि लाभली. गेल्या ६०-७० वर्षांत स्त्रियांची भूमिका करणाऱ्या भाऊराव कोल्हटकर, बाळाभाऊ जोग, बाल गंधर्व, केशवराव भोसले, दिनानाथ, पोतनीस, औंधकर, जोशी यांचीं नांवें ठळकपणें इतिहासांत नमूद केलेलीं आढळतात. त्यांच्या बरोबरीने एकाहि पूर्वीच्या नटीचें नांव दिलेलें आढळत नाही. स्त्रियांची भूमिका करणाऱ्या या पुरुषनटांनी मराठी रंगभूमीला जे वैभवाचे दिवस दाखविले, ते आपल्या कलालाघवानेच, ही गोष्ट महाराष्ट्रीय प्रेक्षक अमान्य करूं शकणार नाहींत. असें असतांहि मराठी रंगभूमीचे वैभवाचे दिवस नष्ट होऊन संमिश्र नाट्यप्रयोगासाठी ती इतकी लाचार होण्याचें कारण काय? तो इतिहास फार मोठा आहे. त्या गोष्टींचा विचार प्रस्तुत विषयाच्या कक्षेबाहेरचा आहे. पण एवढी मात्र गोष्ट खरी की, मराठी प्रेक्षकांना पुरुषांनी केलेल्या स्त्रियांच्या भूमिका पाहवत ना. त्यांत त्यांना कलेचा खून दिसला. पुरुषांनी स्त्रियांच्या भूमिका कराव्या ही कल्पना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांना ओंगळ व त्याज्य वाटूं लागली आणि नाट्यप्रबंधाला अभिप्रेत अशी खरोखर रसनिर्मिति करण्याचें सामर्थ्य पुरुषनटांत नसून त्या रसांचा यथायोग्य परिपोष व्हावयाचा असेल, तर स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच केल्याशिवाय खरे कलापूर्ण नाट्यप्रयोग दिसावयाचे नाहीत, असा प्रचार सुरू झाला.

मराठी रंगभूमि जवळ जवळ पूर्णतःच धंदेवाईकांच्या हातीं होती. महाराष्ट्रीय प्रेक्षकांनी नटांचें कोडकौतुकहि अतोनात केलें. पण समाजांतलि प्रतिष्ठेच्या कल्पना इतक्या काटेकोर आणि मुलखावेगळ्या कीं प्रतिष्ठित समाजांत धंदेवाईक नटांची गणना झालीच तर केवळ अपवादानेच होत असे. त्यामुळे नाटक धंद्यासंबंधीं समाजांत सामान्यतः तिटकाराच असावयाचा व या धंद्यापासून प्रतिष्ठितांनी शक्यतोंवर दूरच राहिलेलें बरें, अशी मनोवृत्ति समाजांत दिसून यावयाची. परंतु नटवर्गासंबंधीचा सामाजिक दृष्टिकोन इतका अनुदार असला, तरी नाट्यकला ही अभिजात कला आहे– अभिजनांनी तिचा संभाळ केला पाहिजे, ही जाणीव व त्याचबरोबर त्या कलेबद्दल अत्यंत आवड ह्या समाजाच्या हृदयांतील गोष्टी होत्या. तेव्हा नाट्यप्रयोग पाहावयास मिळावे ही इच्छा सर्वांना असणारच. पण तें कसें साधणार? धंद्यांतील किफायत नष्ट होतांच धंदेवाईक नट तिला पटापट सोडून चालते झाले. कांहींनी सिनेमाच्या सृष्टीचा आसरा धरला, तर नाटक धंद्याचा उर्जितकाल संपतांच हातांत हिऱ्याची आंगठी व तलम वस्त्रें नेसून रस्त्याने ऐटींत फिरणारा मराठी प्रेक्षकांचा आवडता नट किराण्याच्या दुकानांत चार दोन पैशाच्या पुड्या बांधण्याचें काम करूं लागला.

'हौशी नाट्य-मंडळें' आणि शाळा-कॉलेजांतील विद्यार्थि-संघ यांच्या साहाय्यानेच समाजाची ही नाटकांबद्दलची आवड पुरी करण्यास वाव होता– पण तेथेंहि दैव हात धुवून पाठीमागे होतेंच. संमेलनांत एखादा तरी नाट्यप्रयोग झालाच पाहिजे, यासाठीं मुख्याध्यापकाशीं भांडतां-भांडतां अर्धा वेळ जावयाचा व उरलेल्या आठ दहा दिवसांत नाट्यप्रयोग तयार व्हावयाचा. हौशी नाट्यमंडळांचीहि तीच स्थिति– नाट्यांत हौसेचेंच प्रमाण अधिक–नाट्यप्रयोग व्यवस्थित होण्याकरिता हाडाचीं काडें करावीं लागतात हें कोणाला पटणार? हौसच प्रभावी ठरावयाची व प्रयोग लवकर झाला पाहिजे, या औत्सुक्यामुळे भाषणें पाठ होतांच नाटकांचे प्रयोग व्हावयाचे.

या प्रयोगांत स्त्रियांच्या भूमिका पुरुषांनी कराव्या, अशीच स्थिति होती. पुरुषांच्या भूमिका या घाईत कशाबशा वसवितां तरी येत. पण स्त्रियांची भूमिका करणाऱ्या पुरुष नटांचे हाल होऊं लागले. कुणाला स्त्रियांसारखें बोलतांच येईना. आणि बोलण्याचा प्रयत्न केल्यास तो हास्यास्पद व्हावयाचा, स्त्रियांसारखें चालतां येईना– मग त्याकरिता सर्कस सुरू व्हावयाची, लुगडें सावरतां येईना– पदर सांभाळतां येईना– एकाना दोन, हजार अडचणी येत. सरावाच्या अभावीं अशा नटांचे पाय लटलट कापावयाचे. हास्यास्पद चुका व्हावयाच्या. तें सारें सोंग पाहून पुरुष नटांनी केलेल्या स्त्रियांच्या भूमिका अजिबात नकोत, ही कल्पना दृढमूल झाली आणि पुरुषांच्या स्त्रीभूमिका पाहावयाच्या नाहीत, असा प्रेक्षकांनी निश्चय केला. Drama's laws Drama's Patrons give ही वर दिलेली युक्ति किती खरी आहे, याचा प्रत्यय प्रत्यक्ष दिसला.

अशा वेळीं संमिश्र नाटकांची प्रथा नागपुरांत यशस्वी करण्याची जबाबदारी आमच्यावर आली. प्रा. श्री. ना. बनहट्टी यांच्या नेतृत्वाखाली चालविलेल्या अभिनव

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाट्यमंदिरांतील आम्ही लोक. आम्हांला सारखें एका गोष्टीचें वैषम्य वाटे. महाराष्ट्र-नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष व मुख्य कचेरी नागपूरला असल्यामुळे अखिल महाराष्ट्रांतील नाट्यविषयक गोष्टींचें संचालन करण्याचें काम नागपूरहून होत असे. आम्ही फक्त कागदी घोडे नाचविणारे वीर आहोंत– नाट्यकला जगवायची ती कागदी घोडे नाचवून जगणार नाही– नाटकांचे प्रयोग करवूनच ती जगूं शकेल– आणि नेमकी तीच गोष्ट आम्ही करूं शकत नाही, असा बाहेरच्या नाट्यप्रेमी लोकांचा आमच्यावर आक्षेप असे. आक्षेपांत बरेंच तथ्य असल्यामुळे अशा वेळीं लाजेने आमचे चेहरे कसे होत असत, याचीं छायाचित्रें जर त्या वेळीं कुणी काढून ठेविलीं असतीं, तर लाचारीने खजील झालेल्या माणसांचे चेहरे निसर्गतः कसे दिसत असतात, हें दाखविण्यासाठीं त्यांचा खास उपयोग झाला असता !

पण आम्हांला इतके लाचार होण्याचें कारण काय होतें ? एव्हाना नाट्य-प्रयोग म्हणजे संमिश्र नाट्यप्रयोग, ही कल्पना कलावंतांच्या मनांत निश्चित झाली होती. संमिश्र नाट्यप्रयोग, आणि तोहि नागपूरांत व्हावयाचा ! केवळ कल्पनेने आम्हांला दरदरून घाम सुटावयाचा. १९३९ सालीं नागपूरच्या नाट्यसंमेलनांत केवळ स्त्रियांनीच बसविलेला ‘ लग्नाची बेडी ’ या नाटकाचा प्रयोग करण्यांत आला होता. प्रयोगाच्या चालकांनी संमेलनाच्या चालकांवर त्या वेळीं किती अटी घातल्या होत्या– संमेलन–चालकांना प्रयोग होऊन जाईपर्यंत किती चिंता वाटत होती, याचा अनुभव ताजाच होता– तेव्हा संमिश्र नाट्यप्रयोगाच्या केवळ कल्पनेनेच आमचें धाबें दणाणलें, यांत नवल काय ?

पण मिऊन प्रश्न सुटण्यासारखा नव्हता. ‘ सीदन्ति मम गात्राणि ’ असें म्हणून अर्जुनाची भारतीय युद्धांतून सुटका होऊं शकली नाही, तद्वतच, अडचणींचे व नागपूरच्या सर्वतोपरी प्रतिकूल परिस्थितीचे डोंगर उभे करून भागण्यासारखें नव्हतें. नागपूर नाट्य-संमेलनांत एकहि संमिश्र नाट्यप्रयोग होऊं शकला नाही. त्यानंतरच्या नाशीक येथील नाट्यसंमेलनांत नाशिककरांनी अभिनव-मंडळाच्या कल्पनेचा पुरस्कार करून ‘ छापील संसार ’ नाटकाचा यशस्वी संमिश्र नाट्यप्रयोग करून दाखविला– त्यानंतर मुंबईकरांनी मुंबईच्या नाट्यसंमेलनांत ‘ उडतीं पाखरें ’ आणि ‘ वंशकुल ’ या दोन नाटकांचे संमिश्र प्रयोग करून दाखविले. आता आमच्या अडचणी कोण ऐकणार ? आणि काय म्हणून ? झालें. मनाचा धडा केला. ‘ केल्याने होत आहे रे, आधी केलेंचि पाहिजे ’ या समर्थांच्या वचनाची आठवण झाली ‘ असाध्य तें साध्य, करिता सायास–कारण अभ्यास–’ या तुकोबारायांच्या वचनाची शिधासामग्री पाठीवर घेतली आणि ‘ शीर तुटलें, तरी आमचें कबंध शेवटपर्यंत लढत राहील–’ या लढय्या मराठी बाण्याने आम्ही मोहिमेवर निघालों.

काखोटींत पक्षकाराच्या ब्रीफचे कागद असावयाचे–मनांत मात्र विचाराचें चक्र चालूं. कोणाला शब्द घालून पाहावा ? तो काय म्हणेल ? शोभा तर करणार नाही ना ? ‘ मन चिंतीं तें वैरी न चिंती ’ म्हणतात ना ! त्या म्हणीचा पुरेपूर अनुभव आला. थोड्याफार ओळखीचा फायदा घेऊन उंबरठे झिजवायला सुरवात झाली. ‘ कांही मंडळींना आपला सामाजिक दर्जा पाहून भीड पडली–तर कांहींना ह्याच कारणामुळे आमचा पाणउतारा करतां येईना– कांहींनी आमचें पाऊल दारांत पडतांच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तुम्ही अमक्या कामाकरिता आलां असाल, तर ती गोष्ट आम्हाला अजिबात पसंत नाही, तेव्हा उगीच वाद घालण्यांत अर्थ नाही? असें बेमुर्वत शब्दांत सांगून दारांतूनच आमची बोळवण केली. नाटकें करणाऱ्या लोकांची जी कांही 'पुण्याई', ती सारी आमच्या आड आली– कारण अशा गोष्टी करण्यासाठी आपण आपल्या घरांतील स्त्रियांना संमति देणें योग्य होणार नाही, अशी त्या वेळीं सर्व प्रतिष्ठित मंडळीची निश्चित समजूत होती. संमिश्र नाट्यप्रयोग ही अतिशय घातुक गोष्ट आहे, प्रतिष्ठित समाजाने त्या गोष्टीपासून चार हात दूरच असलें पाहिजे, अशी त्या वेळची मनोवृत्ति होती. पण आमची पुण्याई जबर. हा 'सिंहगड' सर करण्याचें काम स्वयंस्फूर्तीने आमच्या कांही भगिनींनी अंगावर घेतलें. त्यांच्या सामाजिक दर्जाबद्दल, सुशिक्षित-पणाबद्दल व नाट्यगुणांबद्दल कुणालाहि सादर अभिमान वाटावा, अशीच खरोखरीने स्थिति होती व अशा विदुषी भगिनींनी हें पहिलें दिव्य करण्याचें धाडस केल्यामुळेच रंगभूमीच्या शताब्दि महोत्सवांत नागपूरकरांना 'पूर्वग्रह' नाटकाचा संमिश्र प्रयोग यशस्वीपणें सांगली येथे १९४३ सालीं करून दाखवितां आला. संमिश्र नाट्यप्रयोग आणि प्रतिष्ठित समाज यांचे परस्परसंबंध किती एकमेकाला प्रतिकूल असे होते, हें दाखविण्याचा वरील इतिहास निवेदन करण्यांत आमचा हेतु होता. शुद्ध कलात्मक हेतु साधण्याच्या मार्गांतहि कलेच्या क्षेत्राबाहेरील अन्य गोष्टींचा किती जाच सोसावा लागतो, हें यामुळें स्पष्ट झालें.

पण या जाचानेच केवळ भागतें, असें नाही. आणखीहि नानाविध अडचणी सोसाव्या लागतात आणि कलेच्या यशःपूर्तीसाठी निर्माण केलेल्या साधनांचाच कलेची हानि करण्याकरिता कसा उपयोग होतो, हेंहि आमच्या अनुभवाला आलें.

संमिश्र नाट्यप्रयोगांच्या संचालकाला प्रथम कोणत्या गोष्टीचा जाच सोसावा लागत असेल, तर तो स्थानिक परिस्थितीचा– आज त्या परिस्थितींत पुष्कळच फरक पडला आहे, हें येथेच मान्य करतों. पुण्या-मुंबईला स्त्री–पुरुषांतील सामाजिक व्यवहार अधिक सलोख्याचे आणि पुरोगामी आहेत. तेथील समाजांत स्त्री-पुरुषांना एकमेकां-समोर येतांना– समाजांत प्रत्यक्ष वावरतांना– बरोबरीच्या नात्याने काम करतांना कोणताहि संकोच सहसा वाटत नाही. पण नागपुरांत अझून इतकी पुरोगामी स्थिति निर्माण व्हावयाची आहे. बरोबरीच्या स्त्री पुरुषांनी तसेंच कांही जवळचें नातें असल्याशिवाय बरोबर फिरणें लोकांच्या नजरेला अझून पाहवत नाही. संमिश्र नाट्यप्रयोगासंबंधीचा आज वाटणारा बाऊ नष्ट होऊन ती अगदी सामान्य गोष्ट आहे, असें समाजाला वाटत नाही, तोंपर्यंत तरी संमिश्र नाट्यप्रयोगांचें संचालन ही मोठी जबाबदारीची गोष्ट आहे. प्रवाहाबरोबर पोहणारापेक्षा प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने पोहणाराचे जे हाल होतात, व त्याला जें धारिष्ट्य लागत असतें, ते हाल सोसण्याची तयारी व तितकें धारिष्ट्य संचालकाला असावयास पाहिजे. समाजाच्या प्रतिष्ठित-पणाच्या ज्या कांही काटेकोर कल्पना असतील, त्यांना आपण यत्किंचितहि दुखावणार नाही— त्यांची आपण अधिकाधिक सहानुभूति मिळवूं शकूं आणि सहकार्याची भावना निर्माण करूं शकूं– भीतीचा निरास करूं शकूं, या धोरणाने त्याला आपला मार्ग आक्रमावा लागतो–याचमुळे नाटकधंद्यावर समाजाचे जे आक्षेप आहेत– ते समाजाला घेतां येऊं नयेत म्हणून संमिश्र नाट्यप्रयोग हे अभिजनांनीच बसविलेले असावेत, हा सर्वस्वी कलेच्या क्षेत्राबाहेरील दंडक कोणताहि उजर न करतां मान्य करावा लागतो. आम्ही वर दिलेल्या ड्रायडनच्या उक्तीचें हें आणखी प्रत्यंतर म्हणतां येईल.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रत्यक्ष संमिश्र प्रयोग बसवीत असतां नवीन परिचयाचे चार-दोन दिवस वगळल्यास परस्परांतील संकोच नष्ट होतो– संमिश्र नाट्यप्रयोग ही कांही अजब चीज आहे, ही भावनाहि नष्ट होते आणि प्रत्येक जण एखाद्या यंत्राप्रमाणे आपली भूमिका व्यवस्थित बसवून घेण्याच्या उद्योगाला लागतो.

प्रयोगाकरिता नाटकाची निवड करतांनाहि अशीच अडचण पडत असते. आतांपर्यंत प्रसिद्ध झालेलीं मराठी नाटकें आपण घेतलीं, तर त्यांत कांहींना कांही तरी असे प्रसंग असतातच की, जे वठवितांना अगर त्या प्रसंगाची कल्पना मनांत आणतांना नैसर्गिक संकोच वाटावा. नाटकांत काम करूं इच्छिणाऱ्या भगिनींची पहिली अडचण ही असते. कोणत्या नाटकांत आपल्याला कोणती भूमिका करावी लागणार व ही कशी आहे, हें आधी पाहून घेतल्याखेरीज त्यांची संमति मिळणें कठिण. या अडचणीबद्दल आमची कुरकूर नाही. किंबहुना, आजची समाजाची मनोरचना विचारांत घेतली, तर तें साहजिक आणि योग्य आहे, असेंच म्हणावें लागतें. पण कलेच्या सुंदर आविष्काराच्या कल्पनेने आपण जी गोष्ट करूं इच्छितों, त्या गोष्टीच्या आविष्काराच्या आड या अवांतर गोष्टी येतात ना ! या अडचणी निर्माण तरी कोण करतो ! ज्या समाजाला संमिश्र नाटकें पाहावींशी वाटतात– प्रयोग व्हावे अशी इच्छा असते, तोच समाज या अडचणी निर्माण करतो ना ! या गोष्टीमुळे नाटकांतील शृंगाररसाला साहजिकच काढून टाकावें लागतें. शृंगाररसाशिवाय नाटक राहूच शकत नाही, असें नाही. पण नाटकांतून शृंगाररस काढूनच टाकला पाहिजे, ही कल्पनाहि कलेच्या दृष्टिने तर्कदुष्ट आहे.

कित्येकदा शृंगारिक भाषणें असलीं, तर त्यालाहि कांही भगिनींची हरकत नसते. पण रंगभूमीवर का होईना पण स्त्री-पुरुष-पात्रांच्या स्पर्शाचे प्रसंग सहसा येऊं नयेत, या गोष्टींवर त्यांचा मुख्य कटाक्ष असतो. याचमुळे 'शारदादेवी' नाटक प्रयोगरूपाने आणण्याच्या आमच्या विचाराला कायमचें सोडून द्यावें लागलें. अगदी गेल्याच उन्हाळ्यांतलि गोष्ट. हैद्राबादला आम्ही नाट्यनिकेतनचा 'कुलवधु' नाटकाचा प्रयोग पाहून परत येत असतां आमच्या एका चांगल्या नाट्यमर्मज्ञ मित्राने 'कुलवधु' नाटकांतील नायक, नायिका निसर्गतः परस्पर स्पर्शाचे प्रसंग येत असतांहि ते टाळतात, या मुळे रसहानि होते, असा आपला अभिप्राय दिला. संमिश्र नाट्य प्रयोगांत काम करीत असतां काय अडचणी येत असतात, याची आम्हाला पूर्ण कल्पना असल्यामुळे ज्योत्स्नाबाईंच्या अत्यंत सुंदर अशा अभिनयामुळे आम्हीं दिपून गेलों– पण या अडचणींची ज्यांना जाणीव नाही, अशा प्रेक्षकाला आपला रास्त अपेक्षाभंग झालेला दिसतांच त्यांनी चट्कन ती गोष्ट पुढे आणली.

कांही दिवसांपूर्वी आम्ही एक नाट्यप्रयोग पाहिला. त्यांत शेवटीं अरुणा माडीहून उडी घेते व त्यामुळे तिचा अंत होतो. रक्तबंबाळ स्थितींत तिला बाहेरून घरांत आणतात असा शेवटचा प्रसंग नाटकांत आहे. पण या प्रयोगांतील अरुणा खुर्चीवर बसली असतांच शोकावेगाने मृत होतांना पाहिली. आम्हीं पाहिलेला बाल–मोहन–नाटक–मंडळीचा प्रयोग अगदी स्मरणांत होता. तेव्हा हा नाटकांत बदल कसा झाला, हें कोडें पडलें. प्रसंगाचा उठावदारपणा त्यामुळे नष्ट होतो व रसहानीहि होते, हें प्रत्यक्ष अनुभवास आलें. एरव्हींच्या त्या अत्यंत सुंदर अशा प्रयोगाला असें गालबोट का लावलें, हें कळेना म्हणून आमच्या दिग्दर्शक–मित्राला विचारलें बाहेरून

 अरुणेला आणतांना अनेक पुरुषांचा होणारा स्पर्श आम्हाला टाळावयाचा होता,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणून हा फरक केला, असें सांगण्यांत आलें ! या प्रकारांत कोणाच्याहि शुद्ध हेतुबद्दल आम्हाला आक्षेप घ्यावयाचा नाही. पण कलेची सेवा करतांना कलेच्या क्षेत्राबाहेरील अवांतर विचारांना अवसर मिळ'ला असतां कलेची कशी गळपेची होते, याचें उदाहरण म्हणून हा दाखला द्यावासा वाटला.

१९४४ सालच्या नाट्यसंमेलनांत असाच एक गमतीचा व 'कसासाच' प्रकार पाहावयास मिळाला. 'पुण्यप्रभाव' नाटकाचा तो संमिश्र प्रयोग होता. वृंदावनाच्या हृदयांतील ठोके कालिंदीला कोचाआडून ऐकायला आल्याचें दृश्य आम्हीं पाहिलें !! तिला बिचारीला प्रेमाचे व प्रणयाचे विचार देखील नसावेत असें वाटेल अशा लहान वयाच्या किंकिणीने प्रेमाचे आचरट पाठ ऐकिलेलेहि पाहावे लागले. अशा वेळीं कोणताहि रसोत्कर्ष साधण्याऐवजी रसहानीच खास होत असते !

संमिश्र नाट्यप्रयोगांची प्रथा सुरुवातीस सुरू झाली त्यावेळीं स्त्री-भूमिका करावयास कोणतीहि स्त्री असली, तरी चालेल. कोणतीहि भूमिका ती यथायोग्य वठवूं शकेल, अशी वेडगळ कल्पना कांही मंडळींची होती. पण अनुभवानें ही कल्पना किती विफल आहे, हें निदान आमच्या मंडळीला तरी स्पष्टपणें दिसून आलें. परंतु भूमिकेला यथायोग्य अशा व्यक्तींची निवड करावयास निदान ,आज तरी अवसरच नाही. नाटकांत जितक्या स्त्रीभूमिका असतील, तितक्या स्त्रियाच आधी मिळण्याची वानवा. नाटकांत काम करण्याची इच्छा असणारी व्यक्ति, मग पुरुष असो, वा स्त्री असो, त्या व्यक्तींत नाट्यगुण असले तरच काम करूं शकतील–या बाबत आम्हांला आलेल्या अनुभवांपैकी एक दोनच उदाहरणें देतों—

एका बाईना फारच घाईने बोलण्याची सवय होती. प्रयत्नांची पराकाष्ठा केली, तरी बोलण्याच्या भाषेत फरक पडेना—आणि, भाषेकडेच सारें अवधान राखावें लागल्यामुळे त्या आपल्या भूमिकेंत शिरूंच शकत नसत. त्यामुळे भाषाहि बोलणें अवघड होई आणि अभिनयाचीहि तीच स्थिति. शेवटीं बराच प्रयत्न करून तो नाद सोडून द्यावा लागला—दुसऱ्या एक बाई स्वभावाने अतिशय आनंदी व साधारणतः बोलक्याच. पण, आपण नाटकांतील भाषण बोलत आहोंत, या गोष्टीची मनांत कल्पना येतांच चेहऱ्यावरील त्यांचे हावभाव असे विचित्र व्हावयाचे की, त्याबद्दल त्यांची खात्री होतांच त्यांनी स्वतःच तो प्रयत्न सोडला ! अर्थात् नाटकांतील प्रत्येक भूमिकेला उचित अशी पात्रांची योजना घडून न आल्यास व त्या प्रत्येक पात्रांत आवश्यक नाट्यगुण वसत असल्याशिवाय प्रयोग यशस्वी कधींहि होऊं शकणार नाही,

पण या अडचणींना कोणी बघतो का ! नाट्यप्रयोग झालाच पाहिजे, ही अशी एक दुर्दम्य इच्छा असते की, चांगला चिकित्सक नटवर्गाहि 'नगास नग' असला म्हणजे चालेल, अशा वृत्तीने चालतो. चार पुरुषांच्या आणि चार स्त्रियांच्या भूमिका आहेत ना ! मग चार कोणत्याहि स्त्रिया काम करावयास तयार असल्या की, झालें. मग त्या स्त्रिया नाटकांतील भूमिका योग्यरीतीने वठविण्यास समर्थ असोत वा नसोत, ही त्याची 'कामचलाऊ' वृत्ति बनते. हौशी नाट्यमंडळांत अशी अडचण असली, तर नवल नाही. परंतु दोन वर्षांपूर्वी आम्ही पुण्याला कांही संमिश्र प्रयोग पाहिले, त्यांत देखील भूमिका वठविण्यास योग्य अशा स्त्रियांची निवड न झाल्यामुळे प्रयोग साफ पडले !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आतापर्यंत आपण संमिश्र नाट्यप्रयोगांतील उणीवांचाच पाढा वाचला. त्यामुळे एखाद्यांला वाटेल की, संमिश्र नाट्यप्रयोग इतका अवघड असला व त्यांत अनेक उणीवा असल्या तर मग त्याच्या पाठीमागे लागण्याचें कारण तरी काय ? आम्ही आतापर्यंत ज्या गोष्टींचा पाढा वाचला (आणखीहि अनेक अडचणी सांगतां येतील) त्या नष्ट व्हाव्या व वास्तविक यशःसिद्धि अगदी जवळ असूनहि अवांतर कारणांमुळे ती दुष्प्राप्य होऊं नये, हें सांगण्याकरिता.

संमिश्र नाट्यप्रयोगांची कल्पना आमच्यावर कोणी बळजबरीने लादली, असें नाही. शेक्सपीयरचीं सर्व नाटकें सुरवातीला स्त्री प्रयोगरूपाने बाहेर आलीं, त्यांतील ऑफेलिया, डेस्डीमोना, पोर्शिया, लेडी मॅक्बेथ इ. भूमिका पुरुष नटांनीच केल्या व त्यांच्याच बळावर शेक्सपीयरने आपल्या समकालीनांवर मात केली. इंग्लंडांत स्त्रियांनी नाटकांत कामें करावयास सुरुवात केली, ती १६५६ पासून. त्या वर्षी मिसेस कॉलमन या बाईनी एका संगीतकांत (opera) प्रथम काम केलें. त्यानंतर कांही दिवसांनें संमिश्र प्रयोगांची तेथे प्रथा पडली. त्यावेळींहि ही प्रथा पडण्याचें कारण तत्कालीन प्रेक्षकच आहेत. म्हणूनच ‘ All dramatic art depends ultimately for its form and content on the audience ’—असें एक जण म्हणतो प्रयोग प्रेक्षकांकरिताच असतो. त्यामुळे प्रेक्षकांची मर्जी आवड, अनुकूलता या गोष्टींना नाटकाच्या क्षेत्रांत फार महत्त्व आहे.

संमिश्र नाट्यप्रयोगांची महनीयता एका गोष्टींत आहे. नाट्यानुकूल वृत्ति आणि गुण असलेली स्त्री नाटकांत काम करावयास तयार असली आणि भूमिकेला उचित अशी जर ती निवड असली, तर प्रयोगाची यशस्विता निश्चित होते-आणि प्रयोग अधिकाधिक उठावदार व बहारीचा- वठविण्यास हुरूप चढतो. प्रयोगाच्या यशस्वितेच्या आड येणाऱ्या ज्या गोष्टी असतात, त्यांत आपली भूमिका काय आहे, हें समजण्याचीहि कुवत नसणाऱ्या नटांची योजना ही एक गोष्ट असते. पण एखादी सुशिक्षित भगिनी नाटकांत काम करावयास तयार झाली, म्हणजे ही अडचण उरत नाही. आपली भूमिका काय आहे, ती त्या सहज समजूं शकतात. त्यामुळे त्या त्या भूमिकेंत प्रवेश करण्याला त्या पात्राला अडचण जात नाही. तालमींत काम करीत असतां कोणत्या प्रसंगांत कोणता रस प्रधान आहे, त्या पात्राच्या भावना काय आहेत, या गोष्टी कळत असल्यामुळे ते ते हावभाव निसर्गतःच व्यक्त होत जातात आणि त्यामुळे सोबतच्या पात्रालाहि हुरूप येऊन नाटककाराला अभिप्रेत अशा प्रकारें तो प्रसंग रंगत असतो. प्रयोगाच्या यशापयशांत परस्परांचे भाव परस्परांच्या हालचालींत व्यक्त होणें व त्याला पूरक असे हावभाव रंगभूमिवरील पात्रांकडून होणें या गोष्टीला फार महत्त्व असतें—ही लयबद्धता साधण्यासाठी प्रत्येक पात्राने आपल्या भूमिकेशी समरस होणें आवश्यक असते. ही समरसता प्रत्येक पात्र आपली भूमिका समजूतदारपणे बठवूं लागलें, म्हणजे आपोआप निर्माण होत असते.

‘ It is a world of make-believe impugning upon reality ’— असें नाट्यप्रयोगाचें वर्णन करण्यांत येतें. नाटकाचें विश्व हें सत्याचा आभास निर्माण करणारें आहे, म्हणूनच आपण नाटक पाहतों. कलादर्शनामुळे आपल्या मनाला जो आनंद होतो तो का ? याचें उत्तर देतां आल्यास यशस्वी नाट्यप्रयोगांपासून आपणाला का आनंद होतो, हें तर कळेलच, परंतु त्याचबरोबर ती गोष्ट साध्य होण्याकरिता संमिश्र नाट्यप्रयोग हें कसें सर्वांत अधिक उपयुक्त असें साधन आहे, हेंहि कळून येईल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'नाटक हें संसाराचें चित्र आहे' अशी नाटकाची व्याख्या आपण अनेकदां ऐकिली आहे. थोडासा विचार केला असतां ही व्याख्या अतिव्याप्त कशी आहे, हें सहज दिसून येईल. नाटकांत, जी रोज आपण सृष्टि पाहत असतों तीच आपल्याला जशीच्या तशीच पाहावयास मिळावी अशी आपली अपेक्षा असते का? 'नाही'–हेंच त्याचें उत्तर आहे. कलेंत रोजच्या प्रत्यक्ष सृष्टीचेंच दर्शन व्हावें, अशी अपेक्षा असती, तर कलेच्या निर्मितीचें कारणच काय होतें? कलेला रोजची सृष्टि दाखवावयाची नसते, तर सत्याचा आभास निर्माण करावयाचा असतो. प्रत्यक्षांत सहसा पाहावयास मिळणार नाहीत अशीं सूचक व अर्थपूर्ण दृश्यें दाखवावयाचीं हा नाटककाराचा हेतु असतो. नट ते प्रसंग प्रयोगरूपानें दाखवीत असतात. आपण क्षणभर मंत्रमुग्ध होतों. अंतःकरणांतलि कोपऱ्यांत कांहीं आशा, इच्छा दडून बसलेल्या असतात– नाटकांतील प्रसंगांत त्यांच्यापैकी कांहीं आशा–आकांक्षांच्या पूर्तीचीं सुखकारक दृश्यें पाहावयास मिळतात आणि त्या अनुभवाच्या सुखसंवेदनांचा आपण अनुभव घेत असतों व त्या प्रसंगांशीं आपण स्वतःला विसरून समरस होत असतों—आपल्यासमोर खरोखरच एक नवीन विश्व अवतरल्याचा भास होतो. आणि दुसऱ्याच क्षणीं 'अरे, आपण फसलों!' याची जाणीव होत असते—ज्यामुळे आपण स्वतःला विसरलों ती एक कालवन्ताची कलाचातुरी आहे, हें एकदम कळतें आणि त्यामुळे आनंद होत असतो.

प्रेक्षकाला तल्लीन व प्रयोगाशी समरस करून सोडण्याचें हें काम संमिश्र प्रयोगामुळे सहज साधत असतें. प्रेक्षक नाट्यप्रयोगांत तल्लीन होण्यापूर्वीच त्यांची सुख-तंद्री तोडणारे प्रकार त्यांना आढळेल, तर प्रेक्षक क्वचित् तल्लीन होऊं शकणार नाहीत. पुरुषांनी स्त्रियांच्या भूमिका केल्या असतां—रंगभूमीवर दिसणारे माने, जाधव अथवा मास्टर नरेश अशा पुरुष-नटांचें उदाहरण वगळल्यास ही सुख-तंद्री तुटण्याची शक्यता अधिक असते. आणि प्रेक्षक आधीच सावध झाला, तर तो शेवटपर्यंत स्वतःला विसरूं शकत नाही. स्त्रियांनी स्त्रियांच्या भूमिका करण्यांत हा सर्वांत मोठा फायदा आहे. पुरुष नटाला हावभावाखेरीज लुगडें, पदर सावरणें, भाषा, हालचाल–या बाबतींत जाणीव ठेवून प्रयत्न करावा लागतो. त्यामुळे आत्मविश्वासपूर्वक एकाच गोष्टीकडे त्याचें लक्ष राहूं शकत नाही. पण ती गोष्ट स्त्रियांनीच स्त्रियांच्या भूमिका केल्याने सहज साधते. चित्रपटांमुळे सजावटीच्या, नेपथ्याच्या बाबतींत प्रेक्षकांची दृष्टि इतकी चौकस झाली आहे की, त्या दृष्टीला आता पूर्वीचे तुकडे अथवा गंगावनें बरीं दिसत नाहीत. तेव्हा नाट्य व अभिनय-कौशल्य ज्या स्त्रियांत वसत आहे, अशा स्त्रियांनी नाट्यकलेची ही बाजू सांभाळल्यास ज्या उदात्त व शुद्ध कलात्मक हेतूनें संमिश्र नाट्यप्रयोगांची प्रथा पाडण्यांत आली, तो पूर्णपणें सफल होऊं शकेल. अशी परिस्थिति जर निर्माण होऊं शकली नाही, तर मात्र संमिश्र नाट्यप्रयोगांची प्रथा यशस्वी होणें शक्य नाही. नाटकांत काम करावयास येणाऱ्या स्त्रियांची भूमिका पूर्णतः कलावन्ताची असली पाहिजे. कलेखेरीज अवांतर विचारांना व अडचणींना त्यांनी अवास्तव महत्त्व देऊन भागणार नाही.

पण ही गोष्ट पुरुष नटांनाहि करून दाखवितां येणें शक्य नाही. का?–असा कोणी प्रश्न विचारील. महाराष्ट्र रंगभूमीचा गेल्या एका शतकाचा इतिहास नजरेसमोर आणला, तर त्या प्रश्नाला पूर्णतः 'नाही' उत्तर देणें कठीण आहे. पण 'बहुशः

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही ' हें त्याचें उत्तर बरोबर होईल. बालगंधर्वांच्या 'सिंधु' आणि रुक्मिणींच्या भूमिका, दिनानाथांच्या 'लतिका' आणि शिवांगी या भूमिका, केशवरावांची शारदेची भूमिका यासारख्या भूमिका एखाद्या नटीने तितक्याच यशस्वी करून दाखविल्याशिवाय त्याची पूर्ण प्रचीति कुणाला येणार नाही. यावावत आलेला आमचा एक अनुभव सांगावासा वाटतो. बालमोहन नाटक मंडळीने 'लग्नाची बेडी' नाटक प्रथम रंगभूमीवर आणलें त्यावेळीं सिनेमा नटीची भूमिका रा. माने करीत असत आणि त्यांची ती भूमिका इतकी चांगली आणि सफाईदार होत असे की 'लग्नाची बेडी' या नाट्यप्रयोगाचें प्रेक्षकांना ते एक मोठें आकर्षण होतें. बऱ्याच वेळां ती भूमिका आम्हीं पाहिली. बालमोहन नाटक मंडळीचा मुक्काम अमरावती येथें असतां 'लग्नाची बेडी' नाटक पहावयास गेलों. त्या प्रयोगांत सुलोचना पालकर आणि पंडितराव नगरकर यांनी माने आणि सौदागर यांच्या भूमिका केल्या होत्या. प्रयोग पाहून आमची अत्यंत निराशा झाली आणि सुलोचनाबाईपेक्षां माने यांची भूमिका ते पुरुषनट असूनहि किती उठावदार होत असे, याबद्दल खात्री पटली-सारांश भूमिका वठवितांना नाट्यगुण नसले तर स्त्री देखील स्त्रीची भूमिका उठावदार-पणें कशी करूं शकत नाही, याचें प्रात्यक्षिकहि या प्रयोगांत पाहावयास मिळालें. पण त्याचबरोबर 'कुलवधु' नाटकांतील भूमिका ज्योत्स्नाबाई जितक्या चातुर्यानें वठवितात, तितकी ती पुरुषनटाला वठवून दाखवितां आली असती किंवा नाही, याबद्दलहि आम्हाला शंका आहे हेंहि सांगून टाकावेसें वाटतें. पुण्यामुंबईला संमिश्र नाट्यप्रयोगांचा मोसम वर्षभर चालूं असतो. पण असें असूनहि एका ज्योत्स्नाबाई भोळे यांच्या नांवाखेरीज अन्य नटीचें नांव अजून पुण्या-मुंबईबाहेर गेलेलें दिसत नाही. सौ. वर्तक व आताच्या सिनेमा-नटी सौ. लीला चिटणीस यांचाहि आदराने उल्लेख करावा लागेल. पण हीं नांवें आतां रंगभूमिपुरतीं तरी इतिहासजमा झालीं आहेत. सौ. हिराबाई बडोदेकर आणि त्यांच्या भगिनी यांचाहि कुणी उल्लेख करतील. पण अभिनय-नैपुण्याबद्दल हिराबाईंची कधीच प्रसिद्धि नव्हती. सारांश, आज जोत्स्नाबाई भोळे यांच्याखेरीज इतर नटींची प्रसिद्धि नाही. संमिश्र नाट्यप्रयोगाची प्रथा 'नाट्य-मन्वंतरा' पासून चालूं झाली, असें आपण मानलें, तर आज एक तपापेक्षा अधिक काळ लोटला आहे. या दीर्घ कालावधींत पुरुषनटांनी स्त्रियांच्या भूमिका करूनहि या पूर्वीच्या काळीं मराठी रंगभूमि ज्या प्रमाणांत गाजविली, तसें कार्य या संमिश्र नाट्यप्रयोगांनी केलेलें नाही, हें खास—करणार नाहीत, असें का म्हणूं? भविष्यकाळच आपल्याला तें सांगूं शकेल. समाजाच्या सहकार्याचीच काय ती उणीव आहे. मग 'पूर्व दिव्य ज्याचें त्यांना रम्य भाविकाल' ही विनायकांची भाविकालाबद्दलची खात्री खरी ठरायला कोणता उशीर आहे ?

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जातींचे छंद :

(कै. डॉ. माधवराव पटवर्धनांची बाजू)

ना. ग. जोशी, एम्. ए.

● मिरजचे रा. सहस्रबुद्धे यांचा जून १९४८ च्या ' युगवाणी ' त ' जातींचें छंद ' हा लेख प्रसिद्ध झाला आहे, त्याला बडोद्याचे सत्कवि व लेखक रा. ना. ग. जोशी यांनी या लेखांत उत्तर दिलेलें आहे. रा. जोशी हे ' डॉक्टरेट 'साठी छंदासंबंधीं एक प्रबंध लिहीत आहेत, हें ध्यानांत घेतलें, म्हणजे त्यांचा या विषयावरील अधिकार कळून येईल.

★

प्रास्ताविक:—' युगवाणी ' च्या जून १९४८ च्या अंकांत रा. वि. ज. ऊर्फ तात्याबुवा सहस्रबुद्धे या छंद:शास्त्राच्या चिकित्सक अभ्यासकांनीं कै. डॉ. माधवराव पटवर्धनांच्या ' जातींवरून छंद ' कसे बनले असावेत, यासंबंधींच्या मताविषयीं व कांहीं प्रत्यक्ष छंदाविषयीं शंका मांडल्या आहेत. त्यांना उत्तरें देण्याचा हा यथामति प्रयत्न केला आहे. त्यांच्याच लेखांतील उदाहरणें त्यांच्या लेखांत यथास्थान घेतलीं आहेत. ' एक गृहस्थ ' म्हणून ज्यांचा उल्लेख आहे, त्यांच्याप्रमाणेंच मीहि कै. माधवराव यांच्याशीं समहत आहें. परंतु सहस्रबुद्ध्यांची एकाहि ओळीची आपल्या मताप्रमाणे भिन्न असलेली मांडणी न दाखवतां मतभेद व्यक्त करण्याची पद्धत ' औरच ' म्हटली पाहिजे.

शंका १:—छन्द व त्याची सदृश जाति ही एका चालीवर गावयाचीं नाहीत अगर म्हणावयाचीं नाहीत. उदा, ' हरिभगिनी ' जाति व ' छंद '

उत्तर:—छन्द व जाति हे दोन्ही प्रकार मात्रासंख्येच्या कालमाना- (Syllabic quantity) चे आहेत. टाळीचा ठेका देऊन पाहतां हरिभगिनी ' जाती 'ची खालील ओळ अशी खांडित होईल :

। हरिची भगिनी । म्हणे सुभद्रा । रुक्मिणिवहिनी । दया करा ।

८ ८

हरिभगिनी ' छंदा'ची खांडित ओळ अशी:—

ईश्वराची । दया किती । थांग तिचा । लागेना ।

८ ८ ६

दोन्हींतील पहिलीं तीन आवर्तनें (= आवृत्त संधि) ८ मात्रांचीं व शेवटचें ६ मात्रांचें. सहस्रबुद्धे यांनीं मोडणी करून आपलें म्हणणें मांडलेंच नाही, त्यामुळे याहून निराळ्या मोडणीचा संभव उरतच नाही. पुराव्यावाचून विधान व्यर्थ होय !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सारख्या मात्रांचे संधि आवृत्त होत असतां व एकच तऱ्हेच्या आवृत्त संधींच्या ओळी जाति व छंदांत पुनरावृत्त होत असतां चाल बदलण्याचा संभव नाही—अपरिहार्यता नाही व म्हणूनच 'जाति' हरिभगिनी जर 'सताल' असेल, तर 'छंद' हरिभगिनीसुद्धा 'सताल'च राहणार. तो निस्ताल होण्याचें कारण दर्शविलेलें नाही व दर्शवितां येईलसें वाटत नाही.

दुसरी शंका—हरिभगिनी, भवानी, गीति तीस मात्रांच्या जाति असतां (छंदासाठी ?) 'हरिभगिनी'च नांव निवडण्याचें कारण काय ? तसेंच लवंगलता, अरुणप्रभा व शुक्रकला यांसंबंधीं.

उत्तर—या जातींतील चरण घेऊन त्यांचे आवृत्त संधि पाहिले गेले असते, तर ह्या शंका आल्या नसत्या. सहस्रबुद्धे यांनी एकहि उदाहरण दिलें नाही किंवा एकाहि ओळीची मोडणी करून दाखविलेली नाही. खालील उदाहरणांवरून त्यांतील फरक आरशांतल्याप्रमाणें स्पष्ट दिसेल.

हरिभगिनी = । हरिची भगिनी । म्हणे सुभद्रा । रुक्मिणिवीहनी । दया करा
८ ८ ८ ६

भवानी = जी । मला जन्म दे । आइ तीहि या । कालिं पारखी । झाली
८ ८ ८ ४

(आद्यतालकपूर्व 'गा')

गीति = हा पद्यप्रकार 'वृत्त' (अक्षरगणी) व 'जाति' यांच्या मिश्रणानें बनलेला विशिष्टरूप आहे, हें सर्व छंदःकोविदांस माहीत असावयास पाहिजे.

यावरून जो 'छंद' 'भवानी'प्रमाणें आद्यतालकपूर्व सुरू होत नाही व ज्याचा शेवटचा संधि ४ मात्रांचा नाही, पण ६ मात्रांचा आहे आणि जो 'गीती'प्रमाणे विशिष्ट ठिकाणीं लघु अक्षरच पाहिजे, अशा स्वरूपाचा नाही, तो 'हरिभगिनी'सारखाच असल्यामुळे त्याचें 'हरिभगिनी' नांव निश्चित झालें.

आता लवंगलतादि जातींविषयीं:—

लवंगलता = | ललितलवंग ल ता परिशीलन | कोमल मलय स | मीरे |
| ८ ८ | ८ | ४ |

अरुणप्रभा = या | हृदयकाशी | उगवे अरुण | प्रभा शरत्का लीं |
(आद्यतालकपूर्व 'गा') | ८ | ८ | ८ | २

शुक्रकला = | इतुकें दे मज | ला दे मजला+ || मागतसे हरि | तुजला+ ध्रु.

| येती सन्त घ | रासी+, भक्ती | भावें पूजित | त्यांसी | अंतरा

| इतुकें | दे मजला+ ऽऽ | दे मजला+ ऽऽ || मागतसे हरि | तुजला

(ध्रुवपदाची वैकल्पिक मोडणी)

म्हणून ज्या छंदाचे आवृत्त संधि तीन असून ते ८ मात्रांचे आहेत व शेवटचा संधि ४ मात्रांचा आहे, परंतु जो 'अरुणप्रभे'प्रमाणे आद्यतालकपूर्व सुरू होत नाही व ज्याचा अंत्य संधि फक्त २ मात्रांचा नाही, तसेंच, जो 'शुक्रकले'प्रमाणे मध्येच नियत दीर्घाक्षर घेऊन प्लुत मात्रा घेणारा आद्यतालकपूर्व नाही, किंवा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अंतऱ्यांत दुसऱ्या आवर्तनांत ४ मात्रांनंतर खंडित होऊन अंत्याक्षराशीं यमक साधणारा व म्हणून तेथे निश्चित दीर्घाक्षर घेणारा नाही, त्या छंदाला तो 'लवंगलते'–सारखाच फक्त असल्यामुळे 'लवंगलता' हें नांव देणें सयुक्तिकच आहे.

शंका तिसरी—'पादाकुलक' व 'देवीवर' दोन्हि अष्टाक्षरी 'छंद' असतां भिन्न नांवें देण्यांत 'कोणतें शास्त्रीय तत्त्व' सांभाळलें आहे? तसेंच, उद्धव, अचलगति व भुवनसुंदर 'छंदां' विषयीं.

उत्तर:—सहस्रबुद्धे यांनी उदाहरणें दिलीं, पण मोडणी दाखविलेली नाही, यामुळेच त्यांचा घोटाळा होत असतो;

पादाकुलक = कान्हा वाटे | देव भेटे

देवीवर = | रूप | पाहतां लो | चनीं |

पादाकुलक छंदाचे (दीर्घप्राय) चतुरक्षरी दोन आवृत्तसंधि आहेत; पण देवीवर छंदांत आद्यतालकपूर्व द्व्यक्षरी संधि असून मग चतुरक्षरी संधि व शेवटचा पुन्हा द्व्यक्षरी संधि आहे. हा फरक स्पष्टच आहे म्हणून नामभेद. ज्यांतील आवृत्त संधि सारखे, तेच छंद सारखे व ज्याची मोडणी भिन्न आवृत्त संधींची, ते भिन्न, हें शास्त्रीय तत्त्व. तें येथे सांभाळलेलें आहे. ही गोष्ट जरा सूक्ष्मतया पाहिल्यास सहस्रबुद्धें यांना सुद्धां कळणें शक्य आहे.

आता, उद्धवादि 'छंदां' विषयीं मोडणीच्या अनुरोधाने विचार. सहस्रबुद्धे यांनी उदाहरणेंच दिलेलीं नाहीत, मग मोडणी कशी सांपडणार? ती पुढीलप्रमाणे आहे:—

उद्धव — दि | व स मा व | ळू दे

वि | झू दे नि मि | षां त

अचलगति — | का य सां गो | तू ज गा |

| अं त रीं चें | गू ज गा |

भुवनसुंदर — | ना नां | बा हु लीं मा | झी

| बं धा | को ना क्या मा | जीं

यांपैकी प्रत्येकाची आवृत्त संधींबाबतची मोडणी वेगळी आहे. उद्धवांत आद्यतालकपूर्व 'गा' आहे व अंत्य संधि द्व्यक्षरी आहे. अचलगति दोन चतुरक्षरी आवृत्त संधींचा छंद आहे. पण भुवनसुंदरांत द्व्यक्षरी आद्यतालकपूर्व संधि असून शेवटीं एकच 'गा' येतो. प्रत्येकाच्या टाळीच्या टेक्यांत असा फरक पडतो म्हणूनच वर सांगितलेलें शास्त्रीय तत्त्व येथेहि पाळलें आहे व नांव देण्याची पद्धत एकच आहे, ही 'महत्त्वाची गोष्ट' सिद्ध होते.

शंका ४ थी—जाति दिण्डीचा 'छंद' का होत नाही? 'शिथिल जाति' असें न म्हणतां 'छंद' नांव 'चंद्रकांत'ला कशाला?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उत्तर—दिंडी हा पद्यप्रकार आर्या–गीतींप्रमाणें विशिष्ट म्हणजे कांहीं ल–गक्रम निश्चित घेणारा आहे. त्याबद्दल वादस्थानहि आहे. शिवाय तो विषम मात्रांच्या चरणरचनेचा आहे, म्हणून सममात्रक आवृत्त संधींची छांदस रचना त्यांत अशक्य, हें सहस्रबुद्धे यांच्या मित्राचें म्हणणेंच सयुक्तिक आहे. तेव्हां असें अपवादात्मक उदाहरण घेऊन नियमाला बाध आणतां येत नाहीं.

'शिथिल जाति' याची आपली व्याख्या सहस्रबुद्धे यांनी दिलेली नाहीं. एखाद्या जातीची रचना शिथिल असते, म्हणजे तिच्या एकाच चरणांतील एखाद्या आवर्तनांत दीर्घाक्षराचा उच्चार ऱ्हस्व करावा लागत असतो, किंवा त्याच ओळींत पुढील आवर्तनांत एखादें ऱ्हस्व अक्षर दीर्घ उच्चारावें लागत असतें.

युगें अठ्ठा, वीस | वीटेवरी | उभा
वामांगीं | रखुमाई | दिसे दिव्य | शोभा

ह्या उदाहरणाने हें कळून येतें. अशा संमिश्र रचनेच्या जातीला शिथिल रचनेची जाति म्हणणें सयुक्तिक होईल. परंतु जेथे चरणांतील कांहीं अक्षरें दीर्घ असून उरलेलीं दीर्घोच्चारप्राय असतात, तेथे शिथिलता म्हणतां येत नाहीं. कारण तेथें दीर्घत्वाची एकरूपता असते. त्याला शिथिल असें सहस्रबुद्धे म्हणूं शकतील, अशी जातिबद्ध + छांदस मिश्र रचना असूं शकेल. पण 'छन्द' तसे नाहींत.

चंद्रकांत 'जाति' व 'छंद' यांच्या चाली भिन्न आहेत, असें सहस्रबुद्धे आपल्या मित्राच्या साक्षीने लिहितात.

चंद्रकांत जाति व छंद यांच्या चालींत भेद व्हायचें सयुक्तिक कारण नाही, हें पुढील उदाहरणांवरून सहज दिसून येईल.—

| धन्य शिवाजी | तो रणगाजी | धन्याचि ताना | जी |
| प्रेमें आर्जी | सिंहगडाचा | पोवाडा गा | जी |

दुसरी ओळ अशी म्हटली, तरी जाति 'चंद्रकांत'च—

| प्रेमें आर्जी | कोंडाण्याचा | पोवाडा गा | जी |

यांतील सर्व अक्षरें दीर्घ आहेत, पण जातीची चाल तीच राहिली. आता वरील ओळीबरोबरच पुढील छांदस ओळ वाचावी:—

| झा ली वा ई | य था सां ग | पू जा अ व | घी |

चालींत अवश्यमेव फरक कुठे आला? दोन्ही ओळींत सर्व दीर्घोच्चार आहेत. पहिली ओळ रा. सावरकरांच्या पोवाड्यांतील आहे, ती चंद्रकांत जातीची आहे. त्याला जोडलेली ओळ चंद्रकांत छंदाची आहे, ती रा. वा. ना. देशपांडेकृत 'कपटवेष' या नाट्यकाव्यांतील. याचा अर्थ एवढाच की, 'चाल' याचा स्वरांच्या (tunes) बदलाबदलीशीं किंवा उच्चनीचतेशीं संबंध आहे, असें सहस्रबुद्धे यांचें जें म्हणणें, त्याने मात्रिक बंधनात (time beats) फेरबदल झालाच पाहिजे, असें अवश्यमेव नाही. स्वराधिष्ठित चाल बदलेल वा न बदलेल, पण टाळीनें [illegible]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ठेका कायमच राहतो. म्हणून छंदोरचनेच्या दृष्टीने त्यांत भेद मानण्याचें कारण नाही. वरील उदाहरणावरून हें सुतराम् स्पष्ट होतें.

जाति-छंदात्मक 'लवंगलता', 'हरिभगिनी' इ. चें स्वरूप असेंच विस्ताराने दाखवितां येईल.

हा 'चाल' शब्दाच्या अर्थाचा विशेष एका उदाहरणाने स्पष्ट कळेल. "आनंदी आनंद गडे" या सुप्रसिद्ध गीताची 'चाल' दर्शविण्यासाठी पूर्वी "धी ना ता त क धी ना धी" अशी ओळ लिहीत. आता, यांत स्वरमालेचा बदल होऊन क्वचित् रागबदलहि कुणी केला, तरी "धी ना ता त क धी ना धी" या 'चाली'त बदल होत नाही, होण्याचें कारण नाही व होणारहि नाही. कारण ती शब्दयोजना ठेक्याची द्योतक आहे व ती जातिछंद या उभय रूपांत तशीच राहील. म्हणून जातिछंद अचलगति (म्हणजेच 'बालानंद') याची ही चाल अबाधित राहते, ती बदललीच पाहिजे असें नाही.

छंदोरचनेंतील मेळ (Rhythm) हा संगीतशास्त्रांतील (Rhythm) मेळा-प्रमाणेंच टाळीच्या अनुरोधाने पहावयाचा असतो व तो मात्रामापावर (Syllabic quantity) आधारलेल्या जाति 'छंदां'त नियमितपणें पाहतां येतो. छंदोरचनांतील प्रस्तुत जाति छंद भेद हा तार्किक वर्गीकरणाचा भेद आहे. मात्रिक आवर्तनावर आधारलेल्या टाळीरूपा ठेक्याचा नव्हे व म्हणून अशास्त्रीय नाही.

शंका ५ वी — लवंगलता 'छंदा'चें व चन्द्रकांत छंदाचें अशीं दोन्ही उदाहरणें 'शिथिल मात्रावृत्तें' आहेत, असें सहस्रबुद्धे यांस वाटतें. त्यांनी उदाहरणें दिलीं, पण मोडणी नाहीच.

उत्तर — मात्रावृत्तें म्हणजे जाति, असेंच असेल, तर पुढील रचनेंत मीं वर दर्शविलेली संमिश्रता कोठे आली? यांत जातीचें रूप दाखविणारी २ ल = १ ग अशी रचना कोठे आहे?

लवंगलता = येई गा तूं | येई गा तूं | पंढरीच्या | राया ॥

तुजवीण | शीण वारे | क्षीण झाली | काया ॥

यांत दीर्घ व दीर्घप्राय उच्चाराचीं सर्व अक्षरें आहेत, हें स्पष्ट आहे. म्हणून हें उदाहरण छांदस आहे, शिथिल 'मात्रावृत्ता'चें नव्हे.

चंद्रकांत = रामकृष्ण | वासुदेव | भजरे म | ना

आता काय | नरदेह | येईल पु | ना ॥

येथेहि दीर्घप्राय दीर्घ व उच्चाराचीं सर्व अक्षरें आहेत.

रा. सहस्रबुद्धे याच छेदकांत असें म्हणतात की "दोन्ही पदांच्या चालीचा नीट विचार केला व तीं पदें म्हणण्याची पूर्वपरंपरा काय आहे हें समजून घेतलें, तर 'शिथिल जाति' किंवा 'छंद' यांसंबंधीं निर्णय करण्यास साधन मिळू शकेल." हा विचार सयुक्तिक आहे. पण सहस्रबुद्धे यांनीं 'चाल' या कल्पनेबाबत वर दर्शविलेला खुलासा लक्ष्यांत ठेवून मगच हा शोध करावा. येथे त्यांनी आपली माहिती मोडणी मांडून दर्शविलेली नाही. भिन्न चाली (म्हणजे मात्रिक आवृत्त संधि) असतील, तर भिन्न मोडणी होईल. तसें त्यांनी दाखविलेलें नाही. फक्त पद्याक्षरें देऊन शंका लिहिली आहे. अशी चर्चा काय कामाची? तो वितंडवाद होय.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

' आरती ' म्हणून जो पद्यप्रकार आहे, त्यांतील बऱ्याचशा भागांत चरण-रचना मी वर सांगितल्याप्रमाणें, संमिश्र सांपडते. या मिश्र स्वरूपाची कल्पना ' युगे अठ्ठावीस ' इ. उताऱ्यांवरून येईल. अशीकडील उदाहरण मावळकरकृत ' शिवरायाची आरती यांत पहावें. पण म्हणून ' परिलीना ' छंदहि, अशुद्ध नव्य, असें नाहीं. ज्या ' परिलीना ' रचनेंत मात्रांचीं आवर्तनें ' लगत्व ' मोजून पाहता नियमित दिसतात, ती रचना शुद्ध जातीची म्हणावी; जेथे एका आवर्तनात जाति-रूपत्व (म्हणजे—ह्रस्वोच्चारी अक्षरें किंवा दीर्घ दिसणारीं पण अखूड उच्चाराचीं अक्षरें असणें) असेल व पुढील आवर्तनांत छांदस रूप असेल, तेथे तीं ' शिथिल ' म्हणावी; व जेथे सर्वत्र दीर्घोच्चारप्रायत्व असेल, तेथे छांदस रचना म्हणावी. दांत सहस्रबुद्धे यांना घोटाळा कोठे वाटतो, तें समजणें कठीण आहे !

शंका ६–ही शंका कै. माधवरावांच्या ' छंद ' कल्पनेवरील आक्षेपरूपच आहे. त्यांतील खास ' शंकास्पद ' करणारीं स्थानेंच विचारांत घेणें बरें.

कै. राजवाडे यांची परिभाषा जुन्या छंदःशास्त्रांची आहे. वेदांतील छंद अक्षर-छंद आहेत, अशी आपल्या प्राचीन छंदःशास्त्रज्ञाची कल्पना. त्यावरून त्यांनी लगत्वयुक्त अक्षरगणी वृत्तांचेंहि प्रथम अक्षरछंदाप्रमाणें वर्गीकरण केलेलें आहे. त्याला अनुसरून कै राजवाडे, कै. केशव हर्षद ध्रुव (श्रेष्ठ गुजराती छंदोविशारद) व प्रो वेलणकर यांनी परिभाषा वापरली आहे. पण म्हणून अभंगादि ' अक्षरछंद ' व वेदांतील अक्षरछंद सारखे आहेत, असें सहस्रबुद्धे यांना वाटतें का ! त्यांतील उच्चार-पद्धतीत कोणताच भेद नाहीं ! सहस्रबुद्धे हें दाखवूं शकत नाहीत. कै. डॉ. पटवर्धनांनी तें दाखविलें आहे.

आता त्यांच्या कांही उदाहरणांचा विचारः—

शामाराणी छंद — | आम्ही जाणा | वें तें काई
| तु झें व र्म | कोण्या ठायीं
| अ न्त पा र | नाहीं नाहीं
| ऐसें श्रु ति बो ल ती

अभंग हा काव्यप्रकार असून त्यांत भिन्न मात्रावर्तनांच्या रचना आहेत. त्यांतील वरील प्रकारची रचना शामाराणी जातीसारखी आहे. म्हणून तो शामाराणी ' छंद. ' हीच कडवीं लागून आलीं, तर तो ' घनाक्षरी ' प्रकार होतो, पण रचना बदलत नाही.

देवीवर — | रू प | पा हू तां लो | च नीं
| सु ख | झा लें वो सा | ज णी

याची मोडणी स्पष्टपणें निराळ्या आवृत्त संधीची आहे. म्हणून तो निराळा छंद.

कंठगत ओवी असाच काव्यप्रकार आहे. त्याची मात्रिक मांडण निरनिराळ्या आवृत्त संधींची आहे, हें कै. डॉ. पटवर्धन यांनी स्पष्ट दाखविलेलें आहे.

" घनाक्षरी म्हणतांना अगर वाचतांना तीमधील प्रत्येक अक्षराचा उच्चार द्विमात्रिक होत नाही, ही गोष्ट कोणाच्याहि अनुभवाला येऊं शकेल " असें सहस्रबुद्धे यांचें म्हणणें. पण त्यांनी घनाक्षरीचें उदाहरण दिलें नाही, अर्थात् आपली दीर्घोच्चार-रहित मोडणी दाखविलेली नाहीच नाही. आता, पुढील घनाक्षरीचे चरण पाहा :—

सर्व जग	दं भि रा म
वं ना धाडि	ला तो राम
केलें विख्या	त कुनाम
कीं हे पति	मारिणी ऽ ऽ

यांत दीर्घ व दीर्घप्राय उच्चार होत नसतील, तर ते कसे अन्य तऱ्हेचे होतात, तें सहस्रबुद्धे यांनाहि दाखविणें जड जाईल.

निष्कर्ष हा की, रा. सहस्रबुद्धे यांनी छांदसरचनेचें वैकल्पिक स्पष्टीकरण जोंपर्यंत दिलें नाहीं व तें सिध्द झालें नाही आणि कै. पटवर्धनांचें म्हणणें मोडणी दाखवून खोडलें नाही, तोंपर्यंत हे आक्षेप व या शंका शाब्दिक होत, वास्तविक नव्हेत.

रा. सहस्रबुद्धे यांचा छांदस रचनेंतील दीर्घोच्चारत्वाच्या कल्पनेला असलेला पूर्वापार विरोध त्यांच्या ' संगीताच्या कानां 'तील दोषामुळे आलेला आहे. त्यांना जर असें सिद्ध करतां आलें की, ही अभंगादि किंवा ' हरिभगिनी ', आदि रचना टाळीच्या ठेक्यावर म्हटली जात नाही, व म्हणतां येत नाही, तरच तो मतभेद सिद्ध होईल. तसें त्यांनी दाखवून दिलेलें नाही. उलट, जर ठेका असेल, तर सारखीं मात्रिक आवर्तनें आलीं; व म्हणून प्रत्येक अक्षरागणिक दोन मात्रा ही विभागणी स्वीकारणें भाग आहे. त्यांनी मोडणी दाखविली, तरच ही भूमिका बाधित होण्याचा संभव.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'एकोणीस नि अठ्ठावीस'

(O. Henry यांच्या October and June या कथेचा अनुवाद.)

मधुकर श्रीधर मंगरूळकर, बी. ए., एल् एल्. बी.

कॅप्टननं भिंतीवर लटकलेल्या तरवारीकडे खिन्नपणे नजर टाकली. बाजूच्या आलमारींत त्याचा विटका लष्करी गणवेष टांगला होता. लढाईच्या जीवनानं आणि काळानं आपापल्या खुणा त्यावर उठविल्या होत्या. युद्धाचे ते दिवस ... ... आज किती युगं उलटलीं असतील, असं वाटे ... ... सदा आपलें खोगीर कसलेले ... !

– आणि, काय मजा आहे पहा ! युद्धाच्या खाईतून सलामत पार पडलेले आमचे हे महारथी, आपल्या प्रियपात्राच्या नाजुक ओठांतून ओघळणाऱ्या हास्या-साठी नि लास्यासाठी दीन आणि शरणागत झाले होते !

—कॅप्टनसाहेब या वेळी आपल्या शांत खोलीत बसले होते. त्यांच्यासमोर 'तिच्या' कडून आलेलं पत्र पडलं होतं. तेंच तें पत्रं की, जें त्यांच्या मनाचा सारा उत्साह घालवून बसलं होतं. त्यांच्या आशा–आकांक्षांच्या ठिकऱ्या करून टाक-ण्याऱ्या त्या घणाघाती ओळी तीनतीनदा त्यांच्या डोळ्यासमोर तरळत होत्या.

······आपलं पत्र पोचलं. आपल्या पत्नीपदाचा बहुमोल मान देऊं करून आपण माझा बहुमान केला आहे, असं मी समजतें. तरी पण मला वाटतं, या साऱ्या गोष्टी, नीट सरळ सांगून टाकलेल्या बऱ्या. आपली मागणी मला मंजूर करतां येत नाही, याबद्दल दिलगीर आहे···

·······आपली मागणी नाकारण्याचं मुख्य कारण म्हणजे आपल्या वयांतील वाढता फरक ···मला तूं किती किती तरी आवडतोस. पण काय करूं ! आपला विवाह सुखी होणार नाही, हें नक्की··· या गोष्टीचा निर्देश केल्याबद्दल मी दिलगीर आहे. पण माझ्या प्रामाणिक हेतूमुळे आपण माझं कौतुक केल्याशिवाय रहाणार नाही.··· "

कॅप्टननं दीर्घ श्वास घेतला आणि हाताची जुडी करून त्यावर आपलें मस्तक टेकलें. " खरंच, ती म्हणते, हें खोटं आहे कां··· ! त्याला वाटलं··· किती तरी फरक आहे आपल्या वयांत···पण आपण इतके सशक्त आहों, लढाईच्या धामधुमीं-तून कढून बाहेर पडलों, कीर्ति मिळविली, पैसा मिळविला ···मग आपल्या प्रेमामुळं आपल्या वयांतलं अंतर नाही का विसरतां येणार ! तळहाताच्या फोडासारखं वाग-वीन तिला मी ···कशा कशाची म्हणून कमी पडूं देणार नाही ···मग ! —बस ठरलं ···असंच करायचं··· "

त्याचा ठाम निश्चय झाला. त्याला कामाचा फार उरक. मनानं आलेली गोष्ट ताबडतोब झालीच पाहिजे, हा त्याचा स्वभाव. एकदा मनानं कौल घेतला की, त्यांत फरक पडायचा नाही. मन कधी द्विधा व्हायचं नाही. या त्याच्या चपल निर्णयामुळंच तो रणांगणावर प्रसिद्धि पावला होता...आपण तिला स्वतः भेटायचं– स्वतः तिची खात्री करून द्यायची ··· वय ! वय तें काय ! प्रेमापुढं वयाची काय मातब्बरी···!'

दोन तासांत तो तयार झाला व घराबाहेर पडला. चालण्याची ऐट अशी की, जणू एखाद्या मोठ्या मजलेच्या मोहिमेवर जाण्यासाठी बॅटलियनला सावकाश चालण्याचा कमांडरने हुकूम द्यावा. त्यानं गाडी पकडली व तिच्या टेनेसी नांवाच्या गावीं तो उतरला.

कॅप्टन तिच्या बंगलीचं फाटक उघडून आंत गेला. जुन्या पद्धतीची ती टुमदार बंगली होती. आता संध्याकाळ झाली होती. उन्हाळयाच्या दिवसभराच्या उष्म्यानं उबगून गेल्यामुळे बाहेरचा स्वच्छंद, गार वारा अंगावर घेत ती उभी होती. तिचं नांव थिओडोरा डेमिंग. तिनं सस्मित त्याचं स्वागत केलं. तिच्या खालच्या पायरीवर कॅप्टन उभा होता, तेव्हा त्याच्या वयातलं अंतर एवढं जाणवत नव्हतं. तो होता उंच, सरळ. उन्हानं तांबूस झालेला-डोळ्यांचा तजेला तसाच···अन् ती ! यौवनाच्या अर्धोन्मीलीत कळ्या नुकत्या कुठे उगवूं लागल्या होत्या.

"तुम्ही याल, असं वाटलं नव्हतं मला. पण आता आलां आहांत, तर बसा की इथेच या पायरीवर. माझं पत्र नाही का मिळालं तुम्हाला ?–"

"मिळालं तर !' तो म्हणाला, 'अन् म्हणूनच तर मी गाठ घ्यायला आलों. थिओ, लाडके, माझ्या जिव्हारीं असा घाव नको ग घालूंस ! पुन्हा विचार कर...."

थिओडोरा त्याच्याकडे पाहून पुन्हा हळूंच हसली. त्याच्या शरीराकडे, रुबाबाकडे तिनं पाह्यलं, तिची खात्री झाली की, त्यानं आपल्या वयाचीं वर्षे चांगल्या रीतीनें काढलीं असलीं पाहिजेत. त्याच्या शक्तीमुळं तो तिला आवडत होता. त्याचे एकंदर गुण, त्याचं पुरुषत्व, सारं सारं कांही ठीक होतं. पण–!!

"छे छे ! पुन्हा विचार बदलणं शक्य नाही मला–" तिनं मान हलवून तो प्रश्न कायमचा निकालांत निघाला आहे, असं दर्शविलं—तसे तुम्ही मला फार आवडता पण लग्न ?– छे, शक्य नाही. माझं वय आणि तुमचं वय... पण पुन्हा मला कशाला बोलायला लावता त्या अप्रिय गोष्टी ? मला जें कांही सांगायचं होतं, तें मी पत्रानं कळविलं सारं—"

"कॅप्टनच्या तांबुसवर्णी गालावर रंगाच्या छटा उमटून गेल्या. दूरवर पसरलेल्या संधिकालाकडे त्यानं एकवार खिन्न नजर लावली. दूर क्षितिजाजवळ जंगलांतील झाडांची गर्द दाटी दिसत होती. त्या जंगलापलीकडील मैदानांत निळ्या पोषाखाच्या नाविक सैनिकांनी एकदा तळ दिला होता, ती गोष्ट त्याला आठवली. किती युगं लोटलीं त्या गोष्टीला, असं त्याला वाटत होतं. खरंच, नशिबानं आणि काळानं त्याला पुरतेपणी चकवलं होतं. तो आणि सुख यांच्यांत फक्त थोड्या वर्षांचं अंतर मध्ये येत होतं !

थिओडोराचा हात खाली घसरला. त्यानं तो आपल्या कणखर पंजांत धरून ठेवला, तिनं त्याला हरकत केली नाही. भावना ही प्रेमाच्या जवळपास असते. तिला वाटलं, कशाला बिचाऱ्याला आणखी दुखवा... !

ती म्हणाली, "इतकं नका वाईट वाटून घेऊं तुम्ही. तुमचं चांगलं व्हावं, म्हणूनच मी म्हणतें. मी स्वतःशीच सगळ्या गोष्टींचा नीट विचार केला. एक दिवस असा उगवणार आहे की, त्या दिवशीं तुम्हाला माझ्याशी लग्न न केल्याचा आनंद होईल. आता लग्न झालं, तर तुम्हाला थोडा काळ आनंद होईल ... पहिले दिवस फार सुखाचे जातील ... पण असं पहा, कांही वर्षांनीं आपल्यांत किती तफावत पडेल ! आपल्यापैकी एकाला वाटेल, विस्तव पेटवून त्या उबदार हवेंत पुस्तक

नाचत बसावं ... कदाचित् संधिवात .... किंवा म्हातारपणाच्या इतर व्याधींची उपासना करीत बसावं लागेल; आणि नेमकं याच वेळेला आपल्यापैकी दुसऱ्याला नृत्यगृहांना भेटी देण्याचं वेड लागेल! चांदण्या रात्रींचीं सुग्रास जेवणं, सिनेमा... नाटकं .. सारीं कमीच पडतील ... त्या उत्साहापुढं ...!! या दोन प्रवृत्तींची सांगड कशी बरं घालणार? माझं ऐका. जानेवारी महिना व मे महिना इतका जरी या दोन गोष्टींत फरक नसला, तरी-! खात्रीनं रखरखीत आक्टोबर महिना आणि गुलगुलीत जून इतका फरक तर खासच आहे ”

“ प्रिये थिओ! मी तुझ्यासाठी ... तुझ्या म्हणण्याबाहेर नाही मी पण अजून...तुझ्या म्हणण्याबाहेर मी वागणार नाहीं. हवी तर शपथ—’

“ नाही हो! तुम्ही आता वाटेल तें करायला तयार व्हाल, यांत शंका नाही पण पुढें तें जमणार नाही. कृपा करून मला जास्त विचारूं नका—!’

कॅप्टनसाहेब लढाई हरले होते. पण किती झालं तरी मिलिटरीच्या शिस्तींत तयार झालेला तो गडी होता. शेवटचा निरोप घेण्यापूर्वी त्यानं जणु आपल्या चेहऱ्यावरचे भाव झटकून टाकले. आणि खांदे रुंदावून छाती ताठ केली.

त्याच रात्रीं तो गाडीनं परत आला. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं तो आपल्या खोलींत आला. त्याची ती तरवार तशीच लटकत होती.

बाहेर जेवायला जायची त्याची तयारी चालू होती. पांढऱ्या नेकटायचा सुरेख ‘बो’ बांधायचा तो काळजीपूर्वक प्रयत्न करीत होता. तोंडानं मात्र निराशेनं भरलेलं स्वगत भाषण चालू होतं.

“... असंहि असेल, थिओचं म्हणणंच कदाचित् बरोबर असेल. माझी थिओ अजूनहि सफरचंदासारखी आहे, हें कोण नाकारील?... पण यंदा तिला अठ्ठाविसावं वर्ष तरी नक्कीच चालू असेल. अगदी वरवर पाहिलं तरी— ”

कारण असं पहा, आमचे कॅप्टनसाहेब होते अवघे एकोणीस वर्षांचे...... आणि त्यांची ती तरवार. चटनुगाच्या परेडग्राउंडवर काय ती ड्रील करायच्या वेळीं काढली गेली होती.—

●

संपादकीय

गोंदिया अधिवेशन

विदर्भ-साहित्य-संघाचें चालू अधिवेशन गोंदिया येथे तारीख ४, ५ व ६ नोव्हें. या दिवशीं भरण्याचें निश्चित ठरलें आहे. या वर्षी वि. सा. संघाला पंचविसावें वर्ष लागत आहे. यामुळे या संमेलनांत रौप्य महोत्सवहि साजरा होत आहे. अर्थात् हें अधिवेशन विशेष महत्त्वाचें आहे, हें उघड आहे.

वऱ्हाड-मध्यप्रांतांतील सर्व वाङ्मयप्रेमी स्त्री-पुरुष अधिवेशन यशस्वी रीतीने पार पडण्यास हातभार लावतील, अशी आशा आहे.

हैद्राबादच्या प्रजेचा बंधमोक्ष!

अखेर हिंद-सरकारने निजाम हैद्राबाद मधील रझाकारांचे अमानुष अत्याचार असह्य होऊन १३ सप्टेंबर रोजीं आपलें सैन्य त्या संस्थानांत घुसविलें आणि पाचव्याच दिवशीं निजामाने शरणागति देऊन शस्त्रें खालीं ठेवलीं! आता तें संस्थान

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लष्करी गव्हर्नराच्या ताब्यांत देण्यांत आलें असून शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचें कार्य सुरू झालें आहे! हैद्राबाद संस्थानांत घटना समिति स्थापन व्हावयाची असून तेथील प्रजाच आपलें भवितव्य ठरविणार आहे! कांही अकल्पित प्रकार होणार नसल्यास हैद्राबाद संस्थान हिंद संघराज्यांत विलीन व्हावें, असाच निर्णय तेथील प्रजा घेईल, अशी आशा बाळगण्यास हरकत दिसत नाही.

हिंद सरकारने जातीय दंगे होण्याच्या भीतीचा बाऊ न करतां लढा देण्याचें ठरविलें, हिंदी सैन्याने अत्यल्प अवधींत विद्युद्वेगाने मोहीम पुरी करून विजश्री संपादन केली आणि हिंद संघांतील हिंदु व मुसलमान या दोन्ही जमातींनी आक्रमणाच्या कालांत आश्चर्यकारक रीतीने शांतता कायम ठेवली, या सर्वच गोष्टींबद्दल आपणा सर्वांस मनापासून समाधान वाटत आहे!

हैद्राबादचा लढा सुरू होतांच व संपल्यावरहि इंग्लंड व अमेरिका यांतील बरींच वृत्तपत्रें व मुत्सद्दी हीं हिंद सरकारला दोष देऊन निजामाबद्दल सहानुभूति व्यक्त करूं लागलीं होतीं, हें लक्ष्यांत घेतलें, म्हणजे राजकारण हें कसें वक्रगति असतें याची साक्ष पटेल; अर्थात इतःपर हिंदसंघाने इंग्लंड-अमेरिकेच्या स्तुतिनिंदेला कितपत किंमत द्यावयाची, याचा गंभीर विचारच करावयास पाहिजे! जग काय म्हणेल, इकडे बिलकूल लक्ष न देतां ज्याच्या योगाने आपलें ऐहिक कल्याण साधेल अशाच मार्गाचें आपण अनुसरण करावयास पाहिजे!

भाषावार प्रांतरचना लांबणार

संयुक्त महाराष्ट्र लौकरच अस्तित्वांत येणार अशी आशा मध्यंतरी वाटूं लागली होती. परंतु त्या आशेवर पाणी पडणार की काय, अशी भीति वाटण्याजोगी परिस्थिति निर्माण होऊं लागली आहे! मुंबई शहर संयुक्त महाराष्ट्रांत जाऊं न देण्याचा बड्या बड्या भांडवलदारांनी व त्यांच्या आहारीं गेलेल्या कांहीं काँग्रेसजनांनी मनसुबा केलेला दिसतो! यामुळे दहा-पाच वर्षे मुळीं भाषावार प्रांतरचनाच होऊं नये, असे आवाज अनेक ठिकाणांहून ऐकूं यावयास लागले आहेत! किंबहुना भाषावार प्रांतरचनेंत किती तोटे आहेत, या संबंधीहि प्रवचनें होऊं लागलीं आहेत!

हैद्राबाद-लढ्यासारखा महान् प्रश्न उपस्थित झाला असतां भाषावार प्रांतरचनेचा आग्रह कुणीहि समंजस माणूस धरणार नाही. परंतु म्हणून भाषावार प्रांतरचना दहा-पांच वर्षे अस्तित्वांतच येऊं नये, असें खासच म्हणतां येत नाही! कटुता उत्पन्न होऊं न देतां संयुक्त महाराष्ट्राच्या पुरस्कर्त्यांनी संयुक्त महाराष्ट्र शक्य तों लौकर अस्तित्वांत कसा येईल, याची कोशीस करावयास पाहिजे.

साभार पोंच

सुषमा (मासिक)—संपादक रा. कुंडलराय मोहेकर, सुषमा कचेरी, धरमपेठ नागपूर. वा. व. रु. ६.

या मासिकाचे आतापर्यंत निघालेले दोन अंक वाचनीय आहेत. दुसरा अंक तर विशेषच चांगला आहे. मासिकाचें भवितव्य अतिशय आशादायक दिसतें. 'युगवाणी' या नूतन भावंडाचें मनःपूर्वक स्वागत करते व त्यास दीर्घायुष्य चिंतिते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

प्रा. नारायण कृष्ण दिवागर्जे,
सरचिटणीस,
वि. सा. संघ यांजकडून

गोन्दियाचें विदर्भ साहित्य संमेलन

पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणे विदर्भ साहित्य संघ संमेलनाचें ११ वें अधिवेशन गोन्दिया येथे विदर्भांतील विद्वान् साहित्यिक, संशोधक व नामवंत प्राध्यापक डॉ. वि. भि. कोलते यांच्या अध्यक्षतेखाली नोव्हेंबरच्या ४, ५ व ६ या तारखांना साजरें होणार आहे. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या दृष्टीने गोन्दियाचें विदर्भ साहित्य संमेलन किती महत्त्वाचें आहे तें मराठी भाषाभिमानी जनतेला नव्याने सांगावयाची आवश्यकता नाही.

विदर्भ साहित्य संघाचा रौप्य महोत्सव

या अधिवेशनाच्या प्रसंगीं विदर्भ साहित्य संघाचा रौप्यमहोत्सवहि साजरा व्हावयाचा आहे. विदर्भ साहित्य संघाची स्थापना १९२३ मध्ये झाली. गेल्या २५ वर्षांत विदर्भ साहित्य संघाने मराठी भाषेच्या व साहित्याच्या अभ्युदयासाठी काय कार्य केलें त्याचा आढावा घेऊन, 'रौप्य महोत्सव' रुपाने पुढील कित्येक वर्षांतील भरीव कार्यांची मुहूर्तमेढ रोवण्याची सुसंधि यंदाच्या कार्यकारी मंडळाला लाभली याबद्दल त्याला साभिमान आनंद वाटणें अगदी साहजिक आहे. या रौप्यमहोत्सवानिमित्त प्रांतांतील ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिकांचा सत्कारहि होणार आहे. या रौप्य महोत्सवाला उपस्थित राहण्यासाठी अखिल भारतीय कीर्तीच्या महाराष्ट्रीय नेत्यांना निमंत्रणें गेलीं आहेत.

चित्ताकर्षक कार्यक्रम

गोन्दियाच्या स्वागत मंडळाने या संमेलनाचा कार्यक्रमहि अत्यंत चित्ताकर्षक रीतीने आखला आहे. सुप्रसिद्ध वैदर्भीय संस्कृत कवि भवभूति, यांचें संशोधकांनी निश्चित केलेलें, जन्मस्थान पद्मपूर हें गोन्दियापासून अगदी जवळ आहे. म्हणून गोन्दिया येथील संमेलनाच्या वेळीं 'भवभूति स्मारक समारंभ' साजरा करून भवभूतीच्या स्मारकाची योजना आखण्याचें स्वागत मंडळाने ठरविलें आहे. हा समारंभ माननीय ना. पंडित द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या अध्यक्षतेखाली साजरा होऊन, त्याप्रसंगीं प्राचार्य वा. वि. मिराशी, प्रा. सोमलवार, प्रा. चतुर्वेदी, प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, सौ. देशपांडे इत्यादि वक्त्यांचीं भवभूतीच्या गुणवर्णनवर भाषणें होतील. याशिवाय "सीमाप्रदेशांतील मराठीची परिस्थिति" या विषयावर परिसंवाद व "मराठी वाङ्मयासंबंधीं माझी अपेक्षा" या विषयावर भाषणें होतील. या कार्यक्रमांत प्रांतांतील थोर साहित्यिक व पुढारी भाग घेणार आहेत. याशिवाय काव्यगायन, "अंधळयाची शाळा" हा नाट्यप्रयोग इत्यादि करमणुकीचे कार्यक्रमहि होणार आहेत.

गोन्दिया संमेलनाला बहुसंख्येने उपस्थित व्हा !

गोन्दिया येथे भरणाऱ्या विदर्भ साहित्य संमेलनाचीं वरील सर्व वैशिष्ट्यें ध्यानांत घेऊन, महाविदर्भांतील सर्व मराठी भाषाभिमानी जनतेने विशेषतः विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांनी गोन्दियाला वरील संमेलनासाठी उपस्थित राहण्याची कृपा करावी. बाहेर गांवच्या प्रतिनिधींना निवासभोजनादि खर्च तीन दिवसांकरिता रु. ५ येईल. विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांनी सरचिटणिसाकडे वरील संमेलनाला उपस्थित राहण्याबाबत अगाऊ कळविण्याची कृपा करावी.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांत व-हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं. 104|Genl I A अन्वयें ‘युगवाणी’ मासिकास लायब्ररीसाठी मंजूरी दिली आहे.

‘रीटा’मुळे आकर्षक केस—उगवतात

केससमृद्धीसाठीं ‘ रीटा ’ हें एक नवीन साधन आहे. केसाच्या मुळांतील नैसर्गिक स्त्रवणास त्याने पोषण होतें. खवड्यास व टक्कलास अटकाव होऊन अनुपम सौंदर्याने लांब सुंदर केस उगवतात. त्याने खराब केसांना सुंदर चकाकी मिळते आणि वाकड्या केसासाठी तें उत्तम आहे. ‘ रीटा ’ची एक बाटली घेऊन तुमच्या केसांना अनुपम सौंदर्य द्या.

एका बाटलीची किं. १५आणे.

× प्रत्येक ठिकाणीं मिळतें. ×

RITA

HAIR TONIC

उत्तर हिंदुस्थानी सिनेतारका तुम्हांला काय सांगतात ?

ललिता पवार:—ज्यांना उत्तमपैकी केशवर्धक हवें असेल, त्यांना मीं “ रीटा ” वापरून पहाण्याची शिफारस करतें. आणि, मला खात्री आहे की, यावरून आपली मातृभूमि किती उत्तमोत्तम वस्तू तयार करूं शकते हें त्यांना कळून येईल.

शारदा जुन्नरकर:—मी माझ्या केसासाठीं “ रीटा ” वापरण्यास सुरवात केली यायोगें माझे केस जाण्याचें जादूप्रमाणें थांबलें. ‘ रिट्यां ’ त केस नरम करणारीं व त्यांना रेशमाप्रमाणें तकाकी आणणारीं अनेक द्रव्यें असून मीं खात्रीपूर्वक म्हणूं शकतें कीं “ रीटा ” हें एक अद्भुत केशवर्धक आहे.

के. ईश्वरलाल:—मी एकदां “ रीटा ” वापरलें व त्यानंतर माझ्या कुटुंबांतील सर्वच मंडळींना “ रीटा ” वापरण्याची संवयच लागली. माझ्या मित्रांना केशवर्धकांमध्यें “ रीटा ” हेंच पसंत पडेल ही खात्री आहे.

व्हेटो कंपनी, जोन्स् स्ट्रीट, मद्रास.

... ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून ‘ युगवाणी ’ कार्यालय १९।४२५ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ